# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०७/१२/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०७/१२/२००४ रोजी सभा सुचना क्र. १९ दि. ०१/१२/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ६) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ७) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ८) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ९) | श्री. मिलन गो. पाटील | सदस्य |
| १०) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ११) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| १२) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १३) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**रजेचे अर्ज आलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी. तसेच आज बहुतांश अधिकारी अनुपस्थित आहेत. कारण शहरामध्ये साफसफाईचे अभियान सुरु आहे. त्यामुळे अधिकारी अनुपस्थित आहेत. त्याची सदस्यांनी नोंद घ्यायची आहे.

**रिटा शाह :-**

सभा सुरु करण्याच्या अगोदर मागच्या सभेत आपण काशीमिरा रोडचा सर्व्हे केला होता आणि त्याच्या आजूबाजूला पसरलेले जे अनधिकृत बांधकाम आहे त्याचा सर्व्हे केला होता. त्यावेळी असे नक्की झाले. तिथे स्थायी समितीचे सर्व सदस्य हजर होते, सभापती साहेब स्वतः हजर होते. सर्व अधिकारी वर्ग हजर होते. तेव्हा असा निर्णय झाला होता की, हे दोन विषय पटलावर आणायचे. तसेच, दुसरी बाब मागच्या सभेत आपण दोन-तीन विषय बाजूला काढले होते. पुढच्या सभेत घेण्याकरिता तेही विषय येथे दिसत नाही.

**मा. सभापती :-**

विषय घेण्याचे पुर्ण अधिकार सभापती महोदयांचे असतात. आपण केलेल्या सुचनांचा विचार करु आणि सभेला सुरुवात करण्यांत यावी.

**रिटा शाह :-**

आपला अधिकार घ्यायला आम्ही बघत नाही.

**मा. सभापती :-**

आपल्याला रुलिंग दिलेले आहे. आपण बोलू नका.

**रिटा शाह :-**

साहेब, असे बोलून चालणार नाही. तुमचा अधिकार घेण्याचा आम्ही प्रयत्न करत नाही. तुमचा अधिकार आम्हाला पाहिजे देखील नाही.

**मा. सभापती :-**

आपण सदस्य या नात्याने तुम्ही बोललेले शब्द मागे घ्या. आमचे अधिकार पाहिजे असा शब्द तुम्ही वापरु नका.

**रिटा शाह :-**

अधिकार पाहिजे नाही असे मी बोलले आहे. आपण पहिले ऐकून घ्या.

**मा. सभापती :-**

टेपिंग लावा.

**रिटा शाह :-**

तुम्ही टेपिंग लावून बघा. अधिकार पाहिजे असे बोलले नाही. तर तुमचा अधिकार घेण्याचा प्रयत्न करत नाही असे मी बोलले.

**मा. सभापती :-**

पण असा विषय येतच नाही.

**रिटा शाह :-**

तुमचा अधिकार घेऊन मला काय करायचे आहे. मी काय सभापती आहे काय?

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, आपण सर्व स्थायी समितीचे सदस्य जाऊन पाहणी केली. बरोबर ना?

**मा. सभापती :-**

तुम्ही आता बोलायला माझी परवानगी घेतली का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब बोललो.

**मा. सभापती :-**

तुम्हांला आता बोलायला परवानगी मी नाकारलेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

परवानगी नाकारली म्हणजे.

**मा. सभापती :-**

तुम्ही बोलायला परवानगी घेतली का? एक सदस्य बोलत असतांना तुम्ही मध्ये बोलू नका.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब असे बोलले. त्यांनी डायरेक्ट बोलायला सुरुवात केली का?

**मा. सभापती :-**

एका सदस्याचे बोलणे सुरु होते आणि आपण सभापती महोदय बोलतात.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यांचे बोलणे संपल्यानंतर मी बोलायला सुरुवात केली. तुम्ही कुठली परवानगी नाकारली. मी सभापती साहेब बोललो तेव्हा तुम्ही बोलायला दिले.

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्यांना सांगतो की, परमिशन घेऊन नंतर तुम्ही बोला. तुम्हांला परवानगी देण्यांत येईल. आपण परमिशन घेऊन बोला. एका सदस्याचे बोलणे चालू आहे तर आपण नंतर बोला.

**गजानन भोईर :-**

हे सर्वांना लागू असू दे की, सभापती साहेबांच्या परवानगीने.

**कैलासबेन जानी :-**

मग आपण घाई करु नका. सगळ्यांचे बोलणे ऐकून घ्या.

**मा. सभापती :-**

मी बोलायला परवानगी देईन. त्यात प्रश्नच येत नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तसाही शब्द वापरायचा. मी सभापती साहेब असे बोललो आणि सभापती साहेबांना आम्ही का पुकारतो हे तुम्हांलाही समजायला पाहिजे. तरी तुम्ही असे कसे बोलता. मी जेव्हा सभापती साहेब असे बोलतो....

**मा. सभापती :-**

आपण बोलायची परवानगी घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मी जेव्हा सभापती साहेब, तर ह्याच्यासाठी परवानगी मागतोय.

**मा. सभापती :-**

परवानगी मागा. मग मी तुम्हांला परवानगी देईन.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय तेही तुम्हांला विचारतो.

**मा. सभापती :-**

परवानगी तुम्ही घ्या आणि मग बोला.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तेच बोलतोय की, सभापती साहेब बोलतोय तर ह्याचा अर्थ काय होतो?

**मा. सभापती :-**

असे नाही होऊ शकत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, मला परवानगी द्या.

**मा. सभापती :-**

होय, असे बोला ना. मी तुम्ही जेव्हा परवानगी देईल तेव्हा तुम्ही बोला ना. तुम्ही सभापती महोदय बोलाल आणि बोलायला सुरुवात कराल असे होणार नाही. तुम्ही परवानगी घ्या आणि नंतर बोला.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तुमची परवानगी कशी समजायची? तुमचे होकारार्थी काय असेल?

**मा. सभापती :-**

होकार तुम्हांला देईन.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग तेच तुम्ही बोललात ना? मग तेच तुम्ही केले ना? मग तुम्ही परवानगी दिली ना? माझ्याकडे बघितले. तुम्ही कुठे बोललात तुम्हांला परवानगी नाही. मग तुम्ही का असे इन्सल्ट करता?

**मा. सभापती :-**

तुम्ही परवानगी मागा. मी तुम्हांला परवानगी देतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग तुम्ही असे इन्सल्ट कशाला करता?

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, मला अभिनंदनाचा ठराव मांडायचा आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी आपण नंतर बोला. सन्मा. सदस्यांना परवानगी दिल्यानंतर बोला.

**प्र. सचिव :-**

विषयपत्रिकेचे वाचन करुन सभा सुरुवात करावी.

**रिटा शाह :-**

सचिवजी तुम्ही सभेला सुरुवात करा. पण तुम्ही आम्हांला आमचे अधिकार काय आहे? ते सांगा. तुम्ही जर सभेत बोला बोलले तर बोलायचे आणि झोपा बोलले तर झोपायचे, असे काय आमचे अधिकार आहेत? ते सांगा. नाहीतर आम्ही सभेतून वॉकआऊट करु.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने......

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग हे देखील मध्ये बोलले.

**मा. सभापती :-**

ते परवानगी घेऊन बोलत आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

स्थायी समिती सदस्यांकडून काशीमिरा रोडला जाणारा जो नविन रस्ता आपण तयार केलेला आहे. त्या रस्त्यावर बरीच चर्चा घडली. चर्चेअंती असा निष्कर्ष काढला गेला की, आगामी २/३ दिवसांमध्ये स्थायी समितीचे सगळे सभासद त्या रस्त्याची जाऊन पाहणी करतील. स्थायी समितीमध्ये ठरल्याप्रमाणे त्या रस्त्याची सदस्य, सन्मा. सभापती व काही अधिकारी ह्यांना घेऊन त्या रस्त्याची पाहणी झाली आणि आपण मागच्या सभेत ठरल्याप्रमाणे एक टप्पा पुर्ण केला. राहिला प्रश्न सभेवर, विषयपटलावर विषय घेण्याचा. सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी बोलले की, हा विषय विषयपटलावर घ्यावा असे ठरलेले होते. सभापती साहेबांनी त्यांचा विषय न घ्यावा असे बोललेले नाही.

**रिटा शाह :-**

माझे असे नाही तर सर्व सभासदांचे म्हणणे होते.

**हॅरल बोर्जीस :-**

सर्व सभासदांच्या म्हणण्याप्रमाणे तो विषय विषयपटलावर घ्यायला पाहिजे. सभापती साहेबांनी असे रुलिंग दिले की, तुम्ही दिलेल्या सुचनांचा मी योग्य तो विचार करेन. ह्याचा अर्थ काय होतो की, ते हा विषय नक्की पुढे कोणत्यातरी सभेत घेतील. त्यांनी तुमचा विषय न घ्यावा असे कुठे बोलले नाही. त्यांचे वक्तव्य जर तुम्ही ऐकले असेल. तुम्ही दिलेल्या सुचनांचा योग्य विचार करुन त्याच्यावर निर्णय घेण्यांत येईल.

**रिटा शाह :-**

माझ्या एकटीचे म्हणणे नाही तर सर्व सन्मा. सदस्यांचे म्हणणे आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपण मध्ये बोलू नका.

**रिटा शाह :-**

आपण वैतागून बोलू नका. प्रेमाने बोला.

**मा. सभापती :-**

प्रेमाने बोलतो. त्यांना बोलू द्या.

**रिटा शाह :-**

तुम्हांला एवढा वैताग कशाला येतो?

**मा. सभापती :-**

वैतागण्याचा प्रश्न येत नाही. त्यांना पहिल्यांदा बोलू द्या.

**रिटा शाह :-**

तुमचे अधिकाराचे मी बोलले नाही. आपण ते टेप वाजवून बघा. माझा अधिकार आहे असे काय बोलले का?

**मा. सभापती :-**

आपण मध्ये बोलू नका.

**रिटा शाह :-**

मग तुम्ही मध्ये बोलता त्याचे काय?

**मा. सभापती :-**

मला बोलण्याचा अधिकार आहे. मी बोलेन. पण तुम्ही मध्ये बोलू नका.

**रिटा शाह :-**

म्हणून तेच विचारते. आमचा अधिकार काय आहे ते सांगा.

**मा. सभापती :-**

एक सन्मा. सदस्य बोलत असतांना आपण मध्ये बोलू नये.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्या रिटा शाहजी शांती रखिए।

**रिटा शाह :-**

ऐसे कैसे हम शांती रखेंगे? आप शांत हो गए तो हम भी शांत रहनेका क्या?

**मिलन पाटील :-**

पहले एक को बोलने दिजीए।

**मा. सभापती :-**

प्रत्येक सदस्यांनी लक्षात ठेवा की, एक सदस्य बोलत असतांना दुस-या सदस्याने मध्ये बोलू नका. ते बोलत असतांना त्यांचे बोलणे पुर्ण होणार नाही आणि विषयाला वेगळे वळण लागते आणि विषय पुर्ण होत नाही. म्हणून जे सन्मा. सदस्य बोलत असतील त्यांना पुर्ण बोलू दे. त्यांच्यामध्ये कोणी बोलू नका आणि जेव्हा त्या एखाद्या सदस्याचे बोलणे पुर्ण झाल्यानंतर तुम्ही परवानगी मागा, मी परवानगी द्यायला तयार आहे आणि परवानगी नाही दिली तर आपण बोला की, परवानगी का दिली नाही? तर मी सभासदांना उत्तर देईन की, का परवानगी दिली नाही आणि का दिली ते ही मी तुम्हांला सांगेन.

**हॅरल बोर्जीस :-**

ह्या विषयावर सभापती साहेबांनी रुलिंग दिलेली आहे. त्याच्या अधिन राहून मी सांगू इच्छितो की, मा. सभापती महोदय जर ह्या विषयावर अजून काही माहिती गोळा करायची असेल तर ती एकत्रितरित्या गोळा करा आणि हा विषय आगामी स्थायी समितीसमोर ठेवण्याचा संपूर्ण अधिकार आपल्याला आहे. पण फक्त सदस्यांनी दिलेल्या सुचनांचा आपण विचार करा आणि दिलेल्या रुलिंगचे सभापती साहेबांनी सांगितले आणि विषयाला सुरुवात करण्या अगोदर मी या ठिकाणी सर्व स्थायी समितीच्या सदस्यांच्या वतीने लक्षवेधी मांडू इच्छितो.

**रिटा शाह :-**

सॉरी फॉर इंटरअप, तुम्ही लक्षवेधी मांडा. तो तुमचा अधिकार आहे. स्थायी समितीचे सर्व सदस्य फक्त रिटा शाहची मागणी नाही. आपण सभापती साहेबांसोबत सर्व तिथे गेलो होतो. आपले तिथे नक्की झाले होते आणि ठिक आहे. त्यांनी सांगितले दोन-तीन दिवसांत किंवा दोन-तीन महिन्यात काहीतरी त्यांना वाटणार, तेव्हा ते विषय आणणार. हा त्यांचा अधिकार आहे. पण ऑलरेडी तुमच्या अधिका-याने मागच्या सभेत त्रैमासिक खर्चाचा विषय तुम्ही आणला होता आणि काहीतरी कारणास्तव तुम्ही पेन्डींग ठेवले होते. तसेच ठराव क्र. ९० विठोबा देवालय ट्रस्टचा आपण पेंन्डींग ठेवले होते. कारण विधी सल्लागार आले नव्हते. ते इतर दिवशी येतात आणि सभेच्या दिवशी येत नाही. ते दोन विषय आपले पेन्डींग आहेत. ते विषय का घेतले नाही? मागच्या वेळेला स्थायी समितीने जो सर्व्हे केला त्याचा रिपोर्ट काय झाला त्याच्याशी मला देणे-घेणे नाही. तुम्हांला तुमचा अधिकार आहे. तुम्ही तुमच्या अधिकाराप्रमाणे वागा. पण माझा अधिकार एवढा आहे की, ह्या स्थायी समितीच्या सदस्यांच्या हिशोबाने मला ह्या दोन बाबींचे तुम्ही उत्तर द्या. रुलिंग द्या की, विठोबा देवालय ट्रस्टचा आपण प्रोसिडींगमध्ये जे मान्य केले, सभेत आपण जे चर्चा करतो, वेळ घालवतो हे फक्त तो एक माणूस येत नाही म्हणून ते रेंगाळत पडले आहे आणि मागच्या सभेत त्रैमासिक खर्चाचा घेतलेला विषय तो परत ह्या सभेच्या विषयपटलावर का आला नाही? जो तुमचा अधिकार आहे तो तुमचा अधिकार मला घ्यायचा नाही. पण माझा अधिकार आहे की, तो परत का आला नाही. त्याची जाणीव करुन घ्यायची आणि मला तेवढी तरी अक्कल आहे की, तो माझा अधिकार आहे की, तो विषय परत आला नाही.

**मा. सभापती :-**

आपल्या प्रश्नाचे उत्तर मी नंतर देतो. सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीसजी आपण लक्षवेधी मांडून घ्या.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलतोय.

**मा. सभापती :-**

त्यांची लक्षवेधी आहे ती पहिल्यांदा मांडून घ्या.

**गजानन भोईर :-**

जर तुम्ही परवानगी देत नसाल तर आम्ही बोलणारच नाही.

**मा. सभापती :-**

ते लक्षवेधी मांडत आहेत, त्यांना पहिल्यांदा लक्षवेधी मांडू द्या.

**प्र. सचिव :-**

विषयपत्रिकेचे वाचन करायचे आहे ते वाचन झाल्यानंतर लक्षवेधी मांडण्यात यावी.

**गजानन भोईर :-**

लक्षवेधी मांडायच्या अगोदर आम्हांला दोन शब्द बोलू द्या.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, आमच्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही आणि तुम्हांला हे वाचायला घाई आहे का? मग आमचा विषय तुम्ही रेंगाळला त्याचे उत्तर द्या ना. त्यांनी नाही तर तुम्ही उत्तर द्या ना.

**प्र. सचिव :-**

सभेला सुरुवात झाली त्याचे वाचन करायला द्या.

**गजानन भोईर :-**

सभा सुरु होण्याच्या अगोदर मागच्या विषयाचे क्लिअर होऊ दे.

**रिटा शाह :-**

पहिले मागची सभा तरी पुर्ण होऊ द्या.

**गजानन भोईर :-**

आपण ज्या रोडचा सर्व्हे केला त्या बांधकामाबद्दल आपण सांगितले होते, सगळ्या अधिकाऱ्यांनी का असे नक्की होणार आहे की, ते बांधकाम आणि रोडचे काम पुर्ण झाल्यानंतर तो विषय आणायचा असेल तर तसे आम्हांला सांगा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सर्व्हिस रोडचे आम्हांला सांगा.

**गजानन भोईर :-**

तिथे सर्व्हिस रोडचा ठिकाणा नाही.

**मा. सभापती :-**

तुम्हांला त्याचे उत्तर मी दिले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तुम्हांला असे वाटत नाही का की, स्थायी समितीने तिथे जाऊन पाहणी केली? तर तुम्ही हा विषय सभेत घ्यायला पाहिजे होता. पाहणी का केली असे तुम्हांला वाटत नाही का? की, चार वर्षची घेणार परत?

**मा. सभापती :-**

मला त्या विषयाची पुर्ण माहिती घेतल्यानंतर मी संबंधित पदाधिकाऱ्यांना, संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केल्यानंतर तो विषय पुन्हा मी येथे घेईन, तो विषय आणेन.

**जोजफ घोन्सालवीस :-**

फार दिवस गेले.

**रिटा शाह :-**

गेले ते दिवस जाऊ द्या. मी तुम्हांला सांगते, स्थायी समितीच्या अध्यक्षांचा अधिकार होता. त्यांनी आपल्याला सर्व्हे करायला नेले. सर्व सभासदांना त्यांच्या अधिकाराने त्यांनी नेले. त्यांच्याच अधिकाराने जेव्हा तिथे सर्व्हे चालू होता तेव्हा सर्व्हे दरम्यान रुलिंग दिली होती की, आपण पुढच्या सभेत हा विषय घेऊ. आता ते बोलतात की, तो माझा अधिकार आहे की, कुठला विषय घ्यायचा किंवा नाही घ्यायचा. आता परत त्यांनी रुलिंग दिले आहे की, त्याच्यावर मी संपूर्ण माहिती घेऊन तुमच्याकडे तो विषय आणणार. ठिक आहे, पण माहिती घ्यायला आपल्याकडे पहिले एक इंजिनिअर होते. आज आपल्याकडे इंजिनिअरची भरमाट झाली आहे. तरी माहिती घ्यायला एवढा वेळ लागत असेल तर मला असे वाटते की, या महानगरपालिकेचे प्रशासन कुठपर्यंत आणि कसे चालले आहे?

**जोजफ घोन्सालवीस :-**

आम्हांला ते खोदून देखील दाखवले नाही. म्हणजे आमचाही हक्क पायमल्ली केला.

**गजानन भोईर :-**

आम्ही सांगितले की, आम्हांला रोड खोदून दाखवा. लेअर तेवढी टाकली आहे का? त्याचादेखील तुमच्याकडे काय पुरावा आलेला आहे का?

**मा. सभापती :-**

ह्या विषयावर तुम्हांला मी आता रुलिंग दिली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ते लेअरच आपण कधी काढणार? आपण तिथे जे आश्वासन दिले होते, रुलिंग दिले होते की, ह्या सभेत तो विषय आणणार. पण तेही आपण आणले नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य घोन्सालवीसजी, गजानन भोईरजी, रिटा शाहजी ह्यांनी ह्या विषयावर चर्चा केली की, ज्या मागच्या वेळेला आपण दिडशे मीटर रस्त्यावर, ४५ मीटर रस्त्यावर आपण जी पाहणी केली, रस्त्याच्या संदर्भामध्ये त्या विषयी सन्मा. सदस्य आपण त्या ठिकाणी त्या रस्त्यावर जाऊन आलोत, पाहणी केली. त्या विषयावर जी माहिती मिळाली त्या माहितीबद्दल पालिकेचे पदाधिकारी आणि

अधिकारी ह्यांच्याशी चर्चा करुन संपूर्ण चर्चा झाल्यानंतर तो विषय स्थायी समितीपुढे आणेन असे मी ह्या विषयावर सर्व सभासदांना रुलिंग देत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कृपा करुन किती वेळ लागेल ते आपण सांगा.

**रिटा शाह :-**

साहेब, तुमचे रुलिंग त्या विषयावर झाले. ते विषय मला मान्य आहे. त्या काशिमिरा रोडवर किती गफला झाला किंवा चांगले झाले की, वाईट झाले? मी कोणाला एलिगेशन लावत नाही. फक्त कशा प्रकारे सुंदर झाला असाही रिपोर्ट मिळत असेल. तो तुम्ही रिपोर्ट मिळाल्यानंतर एक महिने, दोन महिने, चार महिने, सहा महिन्यांनी रिपोर्ट भेटल्यानंतर आमच्याकडे तो विषय आणा. त्याच्याशी माझे दुमत नाही. तो तुमचा अधिकार आहे हे मी मान्यही केलेले आहे. तुम्हांला तो विषय आणायचा की, नाही आणायचा. पण तुमच्या अधिकाराने जो विषय तुम्ही आणला होता. त्रैमासिक खर्चाचा आणि ठराव क्र. ९० जो प्रोसिडींगचा मुद्दा देवालय ट्रस्टचा जो अपुर्ण विषय आहे, ते एका माणसामुळे. दोन तीन सभा झाल्या आणि दोन सभा झाल्या नाहीत. त्याच्या अगोदरच्या दोन सभेमध्ये एक महिना ते रेंगाळत राहिलेले आहे. त्याच्यावर तुमची काय रुलिंग आहे?

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलते. त्याच्यामध्ये इतिवृत्तांताला मंजुरी देतांना ७ आणि २४ चा ठेका रद्द करण्याचाही त्याच्यात विषय होता. ते सुद्धा दिवस वाढत चालले आहे. आम्ही तो ठेका रद्द करा असे बोललो. पण त्याचे पेमेन्टही झाले आहे आणि तो आज कामही करत आहे. मग त्याचे काय?

**गजानन भोईर :-**

तो विषय येता-येता त्याचा ठेका संपेल.

**प्रभात पाटील :-**

त्याचे वर्ष निघून जाईल आणि त्याला आम्ही परवानगी दिलेली नाही. सचिवजी त्या ठरावावर मी सही केलेली नाही हे आपण लक्षात ठेवा आणि मी त्यावर बसून राहणार आहे. माझी सुचना आहे, मी स्वतःने ठराव मांडला आहे. सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील हे वॉर्ड क्र. २४ चे पदाधिकारी आहेत, नगरसेवक आहेत आणि हे दोन वॉर्डाचे मिळून तो ठेका आहे. आम्ही म्हटलेले आहे की, त्या व्यक्तीकडून तो ठेका काढून टाका. त्याच्यावर आपले रुलिंग काय असेल ते आपण आम्हांला सांगा.

**रिटा शाह :-**

साहेब, मागच्या सभेत आपण रुलिंग दिले होते की, एका ह्याच्यात ठराव आणि अनुमोदन रिटा शाह होते. आपण रुलिंग दिले की, जोपर्यंत माझी सही घेणार नाही तोपर्यंत ते बिल थांबवावे. पण कोणाचे बिल थांबावे अशी माझी इच्छा नाही. दिवाळी होती व कमिशनर साहेबांची काहीतरी लाचारी होती की, लेबर लोकांचा पेमेन्ट द्यायचा होता आणि त्यांनी ते दिले. पण अजुनपर्यंत आपल्या प्रशासनाला त्या पेपरवर माझी सही घ्यायची अजून पण त्यांना वेळ मिळालेली नाही आणि अजून ते काम विदाऊट साईन चालले आहे. म्हणजे आपले प्रशासन आणि आपल्या बॉडीने केलेल्या ठरावाचा आपल्याला काय मान-सन्मान मिळतो? ते आपण आता बघून घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाहजी ह्यांनी जे मागचे विषय होते त्याच्यावर चर्चा केली. त्या विषयावर जे त्रैमासिक खर्चाबाबत काही सन्मा. सदस्यांचे पत्र आलेले आहे. त्या पत्रांचा खुलासा करण्यासाठी तो विषय आपण घेतला नाही. तसेच सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी जो विषय मांडला, जो प्रभागनिहाय साफसफाई ठेका आहे त्या संदर्भामध्ये त्यांची जी ॲग्रीमेंटस् आणि त्यांच्या कामाची पाहणी आणि त्या ॲग्रीमेंटप्रमाणे ती ॲग्रीमेंट सभागृहापुढे आणून त्या ॲग्रीमेंटमधल्या ज्या क्वेअरी आणि आपण दिलेल्या क्वेअरी ह्याचा विचार करुन आपण एखादा ठेका कॅन्सल करतो आणि ठेका कॅन्सल करतांना त्याच्यामध्ये ज्या क्वेअरी असतील त्यांनी जर ॲग्रीमेंटप्रमाणे काम केले नसेल तर आपण तो ठेका जरुर कॅन्सल करु शकतो. मग त्या ठेक्याच्या ॲग्रीमेंटस् आणि त्या कामाचा अहवाल अधिकारी श्री. कांबळेजी तुम्ही ह्या सभेनंतर माझ्या दालनात घेऊन या आणि त्याचा पुर्ण विचार सन्मा. सदस्या प्रभात पाटील आपणही त्या बरोबर राहा आणि आपल्या त्या कामाप्रमाणे काही बघता येत असेल त्या ॲग्रीमेंटप्रमाणे कामे केली नसतील तर जरुर कार्यवाही करण्याचा विषय आपण पुढच्या सभेला आणू.

**रिटा शाह :-**

आणि त्या देवालय ट्रस्टबाबत काय? त्या देवालय ट्रस्टचे जे तुम्ही पेंडींग ठेवले आहे त्याला ठराव आणि अनुमोदन झालेले आहे.

**मा. सभापती :-**

त्या विषया संदर्भामध्ये मी सन्मा. आयुक्त शिंदे साहेब ह्यांच्याशी चर्चा केलेली आहे व जे आपले श्री. साळवी हे विधी सल्लागार आहेत. त्यांनी आज माझ्याकडून परवानगी घेऊनच कोर्टात गेले आहेत. त्यांची आज कोर्टात तारीख होती व कोर्टाच्या तारखेला आपण त्यांना थांबवू शकत नाही. ते परवानगी घेऊन गेले आणि याबाबत मी आयुक्त साहेबांबरोबर चर्चा केली. त्यावेळी ते बोलले की, मला अजुनपर्यंत त्या विषयाची माहिती मिळवायची आहे. देवालय ट्रस्टच्या बाबतीत माहिती मिळाल्यानंतर तो विषय पुनःश्च आपण प्रोसेडींग मंजुरीला आणू. तर प्रोसिडींग मंजुरी करणे, त्या विषयाची माहिती मिळविणे हे दोन्ही वेगवेगळे भाग आहेत. प्रोसिडींग मंजुरीकरिता आपल्याला लागणारी आवश्यक ती माहिती ते प्रशासनाकडून मिळवत आहेत. अशा पद्धतीची माहिती मिळाल्यानंतर आपण तो विषय ह्या ठिकाणी आणू.

**रिटा शाह :-**

आपण प्रोसिडींगमध्ये चर्चा केल्यानंतर मला वाटतं तुमचा ठराव आणि त्याला माझे अनुमोदन आहे. कारण आपण ते प्रोसिडींग मंजुर केली नव्हती. कारण आपल्याला त्यांच्याकडून काही माहिती उपलब्ध झाली नव्हती. पण आपण जी काही चर्चा केली व जो काही ठराव केला व त्याला मी अनुमोदन दिले तो विषय पेन्डींग ठेवण्याचा मतलब नाही. आपण ते प्रोसिडींगमधला ठराव क्र. ९० मंजुर करुन घ्या.

**मा. सभापती :-**

त्याच्यासाठी मी त्या संदर्भामध्ये मा. आयुक्त साहेबांबरोबर चर्चा केली.

**रिटा शाह :-**

आयुक्त साहेबांबरोबर तुम्ही चर्चा काय केली? आम्ही जी चर्चा केलेली आहे. त्याबद्दलची माहिती, म्हणजे पुढे आम्ही काय करायचे? आपण त्यांना चर्चेनंतर काय ठराव दिलेला आहे की, ह्याच्यावर तुम्ही कायदेशीर कार्यवाही करा आणि चौकशी समिती बसवा असा आपण त्याच्यावर ठराव केलेला आहे. तो ठराव आपण मंजुर करुन घ्या. पुढचे काम आयुक्त साहेब बघून घेणार. त्यांना कारवाई करायची आहे किंवा नाही करायची आहे ते आयुक्त साहेब बघून घेणार. तो मुद्दा शेवटी प्रशासनाचा राहणार. आपण जो ठराव केलेला आहे, अनुमोदन दिलेले आहे तो ९० नंबरचा ठराव आपण मंजुर करुन घ्यावा असा ठराव मी मांडत आहे.

**अशोक पाटील :-**

ठिक आहे, ह्याला माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलतोय. तुम्ही स्वच्छता अधिकाऱ्याने जे सांगितले तर ७ नंबर हा आमचाही प्रभाग असल्यामुळे त्याचा अहवाल आम्हांलाही द्यावा.

**मा. सभापती :-**

तुम्हीदेखील त्या सभेला उपस्थित राहावे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, जो विषय प्रोसिडींग मंजुरीचा पेंडींग ठेवला आहे, प्रोसिडींग मंजुरीमध्ये विभागीय साफसफाईचा ठेका जे आता सन्मा. सदस्या प्रभात पाटील व रिटा शाहजी ह्यांनी चर्चा केली तो विषय येथे आपण मंजुरीसाठी ठेवा. आम्हांला त्या विषयावर बोलायचे आहे. साफसफाई व त्या ठेक्याबद्दलही बोलायचे आहे.

**मा. सभापती :-**

तो असा विषय आहे की, तो ठेका आपल्याला नामंजुर करायचा आहे. नामंजुर नाही रद्द करायचा आहे असे सन्मा. सदस्यांचे म्हणणे होते. त्या संदर्भामध्ये ॲग्रीमेंट आणि ते अधिकारी व संबंधित नगरसेवक ह्यांच्याशी चर्चा करुन त्या क्लॉजप्रमाणे कोणकोणती कामे आहेत? त्याची संपूर्ण माहिती घेतल्यानंतर ते नामंजुर करण्याविषयी, ठेका रद्द करण्याविषयी तो विषय आपल्या येथे स्थायी समितीवर येईल.

**अशोक पाटील :-**

स्थायी समितीमध्ये प्रोसिडींग मंजुरी पेंडींग ठेवली आहे ते मिनिटस् कनफर्म करण्यासाठी तो विषय येथे आला पाहिजे. हा जसा विठोबा देवालय ट्रस्टचा विषय ठेवला होता तसा तोदेखील विषय ठेवलेला आहे. तर ते दोन्ही मिनिटस् कनफर्म करण्यासाठी ह्या सभागृहापुढे आले पाहिजे. त्याविषयी आम्हांला काही बोलायचे आहे.

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेला आपण दोन्ही विषयाचे इतिवृत्तांत ठेवू या.

**अशोक पाटील :-**

आणि जो काशिमिरा रस्त्याचा विषय मी येण्याच्या अगोदर चर्चेला गेला त्याची तुम्हीदेखील विभागीय माहिती घ्या आणि आम्हीदेखील माहिती घेतो आणि मग तो विषय आपण विषयपटलावर आणा.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, आपण मला तो ठराव सुधारुन दिलेला नाही. मागच्या सभेत साहेबांनी जे रुलिंग दिले की, त्या ठरावावर व कॅसेटमध्ये ही रिटा शाह ह्यांनी अनुमोदन दिलेले आहे. ते बदलून आपण आम्हांला कुठे काय दिले?

**प्र. सचिव :-**

आपण जे अनुमोदन दिले ते माझ्या रेकॉर्डला आहे.

**रिटा शाह :-**

रेकॉर्डला आहे पण तुम्ही मला त्याची कॉपी द्या. जर एखाद्या सभासदांचे आपले काही चुकले असेल किंवा खोटे नांव आपण चुकून लिहिले असेल तेव्हा ते बदलून आपण आम्हांला दुसऱ्या सभेत द्यायला पाहिजे की, ह्याच्यावर ह्यांचे अनुमोदन होते असे. तर ते कायदेशीर होणार ना?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी ह्या ठिकाणी ठराव व अनुमोदनाचे बोलले तर मी सर्व सभासदांना विनंती करतो की, ठरावावर जे अनुमोदन आपले सुचकाचे ज्या सह्या असतात त्या सह्या ठरावाच्या त्याच मिटींगमध्ये तो विषय आला पाहिजे. तो विषय येतो त्याचवेळेला आपण त्या सह्या कराल अशी मी आपल्याला विनंती करतो. कारण आपण काय करतो, ठराव झाल्यानंतर सह्या नंतर करतो. त्यामुळे त्या ठरावात काय लिहिले गेले आहे हा प्रश्न निर्माण होतो आणि प्रोसिंडींगच्या वेळेला आपण बोलतो की, हा ठराव असा मांडला होता, तसा मांडला होता. म्हणून कृपया सर्व सभासदांना मी विनंती करतो आणि दुसरी गोष्ट अशी आहे की, ठरावावर आपण सह्या केल्या तर अति उत्तम. त्यात प्रश्न येतच नाही. कारण जेव्हा ठराव होतो व त्या ठरावावर जी टेपिंग होते त्या टेपिंगच्या माध्यमातून आपल्याला संपूर्णपणे त्याला पुढील कामकाज करण्याकरिता आपल्याला मिळेल. पण आता श्री. कांबळेजी जो ठराव मांडला होता तो ठराव आपल्याकडे तयार आहे का? तो ठराव त्यांना द्या.

**रिटा शाह :-**

तोच मुद्दा उपस्थित करते. तुमचा अधिकार आणि माझा अधिकार परत आला. माझा अधिकार होता. ज्या दिवशी कमिशनर साहेबांना त्यांचे पेमेन्ट करायचे होते आणि त्यात प्रशासन चुकले. मी चुकली नाही सही करायला. त्यात प्रशासनाचे चुकले. त्यांनी कॅसेट निट ऐकली नाही व प्रोसिडींग बरोबर वाचली नाही आणि भलत्याच नगरसेवकाची त्यावर सही घेतली. त्यानंतर मी हा मुद्दा उपस्थित केला आणि त्यावर तुम्ही रुलिंग दिली की, त्यावर मॅडमची सही घ्या. दिवाळीचा सण होता. लेबरला पगार द्यायचा होता. म्हणून त्यांचे बिल काढायचे होते. ते सर्व मला मान्य आहे. पण रिटा शाह मिरा भाईंदर क्षेत्रामध्येच राहते. माझ्याकडे यायला त्यांना जेट विमान, बस किंवा ट्रेनने यायचे नव्हते तर ते माझ्याकडे पायी देखील येऊ शकत होते किंवा त्यांनी मला एक फोन केला असता की, मॅडम तुमची सही घ्यायची आहे. मला ते बिल पेमेन्ट करायचे. कारण सभापती साहेब आपण ते रुलिंग दिले होते की, बिल थांबवा. तशी रुलिंग मी दिली नव्हती. तुमच्या रुलिंगच्या विरोधात जाऊन कमिशनर साहेबांनी ते पेमेन्ट केले, त्यात दुमत नाही. त्या गरिबांचे पेमेन्ट व्हायला पाहिजे होते. पण माझा अधिकार होता तिथे सही करण्याचा आणि माझ्या अधिकाराचे असे की, ती सही सन्मा. सभासद आहे व ती सही महत्वाची होती आणि विदाऊट माझ्या सहीशिवाय त्याचे इम्प्लीमेंन्ट होऊ शकते, त्या ठरावाचे. तर माझ्या सहीची गरज आता कुठे राहिली?

**मा. सभापती :-**

आता आपल्याला त्या ठरावावर सही करायची आहे.

**रिटा शाह :-**

मी काय मुद्दा उपस्थित केला?

**मा. सभापती :-**

तुम्ही मुद्दा उपस्थित केला की, अशा पद्धतीने ठराव केल्यानंतर..........

**रिटा शाह :-**

मग आमच्या सन्मानाचे आणि आमच्या अधिकाराचे काय? सही करायचे की नाही तो मुद्दा नंतरचा आहे. पण आमच्या अधिकाराचे काय? असे बघायला गेले तर तुमच्या अधिकाराचेदेखील पालन झालेले नाही. तुम्ही स्वतः रुलिंग दिलेली आहे. ते बिल दिले त्याच्याशी माझे दुमत नाही. बिल द्यायला पाहिजे आणि जेवढे काम झाले ते कमिशनर साहेबांनी बघितले असेल. पण मी काही या क्षेत्राच्या बाहेर राहत नाही. मला एक फोन केला असता तर मी धावत येऊन सही केली असती. पण तिथे माझ्या सहीची गरज वाटत नाही असे मला वाटते आणि हा एक स्थायी समिती सदस्याचा प्रश्न नाही सर्वच सदस्यांच्या अधिकाराचा प्रश्न आहे. म्हणजे माझ्याबरोबर अन्याय झाला आहे आणि आता मी बोलली म्हणून सही घ्यायला लगेच येणार.

**मा. सभापती :-**

सन्मा. अधिका-यांनी ह्याच्यावर माझ्याबरोबर असा खुलासा केला की, आपल्याकडे सहीसाठी गेले होते.

**रिटा शाह :-**

कुठे गेले होते?

**राजकुमार कांबळे :-**

मी फोन केला होता तेव्हा आपण सांगितले की, टेपिंग वाजवून बघणार आहे.

**रिटा शाह :-**

बरोबर आहे. तेव्हा रुलिंग दिली नव्हती. तेव्हा मी तुम्हांलाही सांगितले होते की, ह्याच्यावर माझे अनुमोदन आहे आणि तोपर्यंत तुमचे रुलिंग झाले नव्हते. सभेमध्ये ठरलेच नव्हते. तुम्ही असे रुलिंग दिले होते, कॅसेट वाजवून बघा की, काय आहे? तेव्हा तसे झाले होते. त्यानंतर तुम्ही रुलिंग दिली आणि रुलिंग दिल्यानंतर कमिशनर साहेबांनी बिल पेमेन्ट त्याच दिवशी केले आणि त्या दिवशी केले, त्या दिवशी तुम्ही माझ्याकडे सही घ्यायला आलात का?

**राजकुमार कांबळे :-**

नाही. पण नंतर त्यांना फोन केला.

**रिटा शाह :-**

ते बिल झाल्यानंतर. अगोदर कोणी आले नाही.

**राजकुमार कांबळे :-**

ते माजी सभापतींच्या सहीने झाले.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाहजी मी तुम्हांला सांगतो की, आता.......

**रिटा शाह :-**

तो ठराव झालेला आहे. त्या ठरावाशी देखील माझे देणे-घेणे नाही.

**अशोक पाटील :-**

मघाशी सभापती साहेबांनी विनंती केली, ज्या सभेमध्ये आपला जो ठराव होईल त्याच सभेत सह्या करायच्या. याबद्दल मी सुचना मांडतो की, आपण इतिवृत्तांत कायम करतो. ठराव या सभेत मांडा किंवा पुढच्या सभेत. प्रोसिडींग कनफर्म करतो त्यावेळी तो ठराव कायम होईल. त्यावेळी त्याच्यावर सह्या घ्याव्यात.

**मा. सभापती :-**

आपण ज्या पद्धतीने मा. महासभेला ठराव देतो. सुचक आणि अनुमोदन म्हणून आपण ठराव देतो आणि तो ठराव आपल्याकडे जी.बी.ला येतो. त्याच्यानंतर तो ठराव दिला जातो. तर ठरावाची प्रोसिजर अशी आहे की, जेव्हा सुचक व अनुमोदनाची सही करुन दिल्यानंतर तो ठराव सभेपुढे येतो आणि तो ठराव आल्यानंतर पुन्हा तो ठराव प्रोसिडींगला येतोच. परंतु, आपण अशी पद्धत ठेवलेली आहे की, ठराव देतांना सही आणि अनुमोदकाने सही करायची आणि ठराव द्यायचा. यापुर्वी जेव्हा नगरपालिका असतांना आपण त्या ठरावावर अनुमोदन आणि सुचकाची सही करत होतो आणि त्यावेळी त्याचे इतिवृत्तांत तयार व्हायचे आणि आता आपल्या दोन्ही सभागृहांमध्ये मा. महासभेमध्ये आणि स्थायी समिती सभागृहामध्ये आपण टेपिंग करतो. आपली ऑडीओ टेपिंग असते. त्या टेपिंगमध्ये सुद्धा त्याचा उल्लेख होतो. आपण आपल्या सोयीनुसार म्हणजे आपण त्या पद्धतीने जो ठराव केलेला आहे. त्या ठरावाशी मी पुर्ण सहमत आहे. या अनुषंगाने आपण त्या ठरावावर अनुमोदन आणि सुचक सही करतो आणि ते प्रोसिडींगला पुन्हा त्या पद्धतीने येते. असे बहुतांश महानगरपालिकेमध्ये स्थायी समितीत ठरावावर सही केली जाते. काही स्थायी समितीत ठरावावर सही केली जात नाही. अशा बहुतांश

महानगरपालिका आहेत की, त्या सर्व महानगरपालिकेत अनुमोदन आणि सुचक सही करतात. हा विषय नाही. परंतु प्रत्येक महासभेत अनुमोदक आणि सुचक ठरावावर सही करतो. परंतु, अशा बऱ्याचशा महानगरपालिका आहेत, ज्या महानगरपालिकेमध्ये स्थायी समिती कम्पलसरी सह्या केल्या पाहिजे असा विषय नाही. म्हणजे इतर महानगरपालिकेत आणि आपली नगरपालिकाची महानगरपालिका व्हायच्या अगोदरसुद्धा आपण स्थायी समितीला सुचक आणि अनुमोदन सही करत नव्हतो. परंतु, महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर आपण ती सुरुवात केली. तर माझे असे म्हणणे आहे की, जर आपण मा. महासभेला सही करुन ठराव दिला तरीसुद्धा तो ठराव आपण प्रोसिडींगला आणतो. पण त्याच्या अगोदर आपण जो ठराव दिला सही करुन, तो ठराव तुम्ही काय लिहिला आहे तेही क्लिअर होईल. ह्याच्यामध्ये माझी कोणती चुकी नव्हती. म्हणजे जेव्हा मी तुम्हांला ठराव करुन दिला त्या ठरावावर सुचक म्हणून मी सही केल्यानंतर तो ठराव आपण वाचून केलेला असतो आणि अनुमोदनाची सही त्यानंतर केली तर त्या इतिवृत्तांताला त्या ठरावात बदल करण्याचा प्रश्न येणार नाही.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, आपण जो विषय घेतो, ज्या विषयावर ठराव करतो ती चर्चा होते, चर्चेतून काही सुचना होतात, उपसुचना होतात. ठरावात दुरुस्तीही आणि त्याच्यानंतर तो ठराव फायनल केला जातो आणि आपले प्रशासन असे नाही की, पटकन तो ठराव टाईप करुन येथे लगेच आणला जाईल आणि तिथल्या तिथे तो कनफर्म केला जाईल आणि माझे असे मत आहे की, चर्चा झाल्यानंतर एवढे इमिजेट तुमचे प्रशासन लगेच टाईप करुन देईल का? आणि तुम्ही जे म्हणता की, सुचक-अनुमोदन सह्या करण्याची पद्धत इतर नगरपालिकेत किंवा महानगरपालिकेत आहेत. तर माझ्या मते ह्याच्यावर आयुक्त साहेबांनी लिगल ओपिनियन आम्हांला सांगावे की, नक्की ह्याच्यावर काय?

**प्रभात पाटील :-**

नक्की काय आहे त्याची माहिती द्यावी. म्हणजे प्रत्येक महानगरपालिकेने स्वतःची अशी शैली वापरायची का? की, ते इतिवृत्तांतानंतर मंजुरी द्यायची का ताबडतोब सह्या करायच्या? कायदा काय बोलतो?

**रिटा शाह :-**

रणखांब साहेब, आपण ह्याच्यावर उत्तर देण्या अगोदर माझाही एक प्रश्न आहे की, जसे सन्मा. सदस्य अशोक पाटील साहेबांनी विचारले जसे चर्चा आणि ठराव व अनुमोदन, त्यानंतर त्याच्यामध्ये उभारलेला ठराव तो टाईप करायला अर्धा तास तरी जातो. तर मला असे वाटत नाही की, ह्या सभागृहामध्ये कोणी असा टाईपिस्ट आहे की, लगेच तो ठराव टाईप करुन देईल. माझे असे म्हणणे आहे या समितीमध्ये मी सव्वा वर्ष काढले. आपण जसा ठराव मांडला तसे लगेच ते मागून ठराव घेऊन येतात. म्हणजे त्याचा अर्थ ते अगोदर ठराव करुन ठेवतात. म्हणजे आमच्या चर्चेच्या अगोदर ठराव होऊन जाते आणि ते आमच्या सह्या घ्यायला येतात. असा प्रकार तुम्ही करु नका. जेव्हा चर्चा झाली, ठराव झाला त्याच्यानंतर ते टाईप करा आणि आमच्याकडे ते आणा.

**मा. सभापती :-**

याबाबत मी खुलासा करतो. जो ठराव प्रशासन आपल्याला करुन देते, तो ठराव मांडतांना तो ठराव आपण मांडतो. म्हणजे सन्मा. सदस्यच ठराव मांडतात. मग सन्मा. सदस्यांनी तो ठराव मांडतांना त्या ठरावाचे वाचन करुन त्याच्यामध्ये ज्या काही आपल्या सुचना असतील त्या सुचना सुचवूनच आपण ठराव मांडायचा. कारण ठराव प्रशासन आपल्याला देते. एकंदरीत प्रशासनाने ठराव दिल्यानंतर आपण तो ठराव दिला पाहिजे आणि आपण त्या ठरावाचे वाचन करुन कायम केला पाहिजे.

**अशोक पाटील :-**

प्रशासन आपल्याला फक्त टिपणी देते.

**मा. सभापती :-**

कायदेशीर नाही, जे ठराव असतात ते ठराव सदस्यांनी द्यायचे असतात. पण आपल्याला या कामी काही ठरावामध्ये आपल्याला सन्मा. सदस्यांना प्रशासन मदत करते की, अशा प्रकारचा ठराव आहे. जसे विषय त्यावेळेला असतात त्याप्रमाणे त्यावेळी ठराव कोण मांडते, तर प्रशासन ठराव मांडत नाही. ठराव कोण मांडतो तर सन्मा. सदस्यच ठराव मांडतात आणि सन्मा. सदस्य ठराव मांडत असतांना त्या ठरावामध्ये काही सुचना असतील, ठरावात काही बदल असतील तो बदल आपण करुन तो ठराव आपण द्यायचा.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, म्हणजे प्रशासन आपल्याला टिपणी देते. आपण सन्मा. सदस्य सभागृहात त्याच्यावर चर्चा करतो आणि कदाचित त्या टिपणीच्या विरोधात देखील आपण ठराव करु शकतो.

**मा. सभापती :-**

मी काय बोललो तो माझा मुद्दा आपल्या लक्षात आला नाही.

**प्रभात पाटील :-**

त्यांना असे बोलायचे आहे की, त्यांनी जरी ठराव लिहिलेला असेल तरी आपल्या सुचनांसहित ठराव आपण मांडायचा.

**मा. सभापती :-**

आपण जे ठराव मांडतो ते ठराव प्रशासन मांडत नाही. ठराव आपण मांडतो. सन्मा. सदस्य ठराव मांडतात. सन्मा. सदस्य अशोक पाटीलजी प्रशासनाने आपल्याला ठराव दिला तर तो ठराव कोण मांडतो? तर आपण मांडतो. मग त्या ठरावात बदल करायचा असेल, ठराव आपल्या म्हणण्याप्रमाणे मांडायचा असेल तर तो ठराव आपण मांडायचा. प्रशासन इन टू ब्रॅकेट आहे. प्रशासन ठराव देते असे आपल्याला बोलून चालणार नाही. आपण चर्चेमध्ये बोलले, ते वाक्य आपण काढूया की, प्रशासन आपल्याला ठराव देत नाही. ठराव आपण मांडतो. मग ठराव मांडताना जर ठरावाची आपल्याला मुद्देसुद माहिती हवी असेल तेव्हा आपण प्रशासनाची मदत घेतो. त्या मदतीमध्ये ज्या सुचना असतील त्याच्यात आणखीन काय टाकायचे असेल ते आपण मांडायचे. म्हणजे ठराव मांडायचा पुर्ण अधिकार कोणाला आहेत, तर आपल्याला आहे. प्रशासन ठराव देतच नाही, प्रशासन ठराव मांडतही नाही, टिपणी देते, गोषवारा देते. आपण ठराव आणतो. आपण आपल्या मदतीने ठराव मांडतो की, अशा पद्धतीचा तो ठराव असतो व त्या ठरावाचा मायना कसा असला पाहिजे व ठराव मांडायचा पुर्ण अधिकार आपले आहेत. मग ठरावाबाबत प्रशासनाचा प्रश्न येतच नाही. म्हणून ठराव आपणच मांडायचा आहे. कारण शेवटी लिहिलेला ठराव आपण वाचता, त्याच्यात काय दुरुस्ती असेल, त्याच्यात काय चुका असतील किंवा आणखीन काय त्या ठरावामध्ये घालायचे असेल ते आपण घालायचे आहे. ठराव प्रशासन करते हा विषय नाही. विषय प्रशासनाने आणलेला असतो पण तो ठराव आपला असतो. ठराव मांडायचा अधिकार व ठराव देण्याचा अधिकार प्रशासनाला नाही तर आपल्याला आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, मी दोन प्रश्न विचारले, त्याचा अर्थ तोच झाला. ठराव करायचा आणि ठराव द्यायचा अधिकार सभासदाचा आहे. मग प्रशासन आमच्याकडे ठराव कसे काय फॉरमॅटमध्ये घेऊन येतात, सही करायला.

**मिलन पाटील :-**

मागचा जो आपला विषय झाला, सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांचा, तो फार गहन आहे. तुम्ही हसण्यावारी तो विषय घेऊन गेले. परंतु, त्याच्या प्रभागात जो ठेका दिला होता त्याला सुरुवातीपासून त्यांचे ऑब्जेक्शन होते की, हा ठेकेदार बरोबर नाही आणि तो ठेकेदार असल्या कारणाने ईस्टमध्ये डेंग्युचा जो प्रसार झाला तो कदाचित तुमच्या प्रभागात किंवा बाजुला, ईस्टमध्ये झाला. त्याचे गांभिर्य आपण लक्षात घेऊन त्या ठेकेदाराच्या विरुद्ध प्रभात ताईने बोललेले आहे आपण तो विषय घेऊन त्याच्यावर कडक कार्यवाही करुन तो विषय प्रथम घ्यायला पाहिजे. कारण जो ठेकेदार बरोबर काम करीत नाही आणि आज आपण लाखो करोडो रुपये ह्याच्यावर खर्च केलेले आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपल्या ह्या प्रश्नावर मी रुलिंग दिली होती. त्याच्यावर असे रुलिंग झाले की, सन्मा. सदस्या व संबंधित अधिकारी त्यांचे ॲग्रीमेंट घेऊन आपल्या दालनात चर्चा करायची आणि चर्चा झाल्यानंतर आपल्याला ज्या क्वेअऱ्या काढायच्या आहेत त्या क्वेअऱ्या काढायच्या आणि त्या क्वेअऱ्या काढल्यानंतर आपण तो विषय ह्या विषयपटलावर आपण ह्या पुढच्या सभेला घ्यायचा आणि तो विषय घेऊन चर्चा करायला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

डेंग्यु आणखीन पसरला तरी हरकत नाही. त्याचं आपण सगळे चेक करु. तो बरोबर चालत असला तरी डेंग्यु पसरु दे. काय फरक पडतो? सर्व्हे करु, रिपोर्ट घेऊ, डेंग्यु पसरु दे.

**अशोक पाटील :-**

साहेब, आपण हे पुढच्या सभेत घ्या.

**मिलन पाटील :-**

एखाद्या डेंग्युमध्ये आपला सभासद कधी बळी पडता तर?

**प्रभात पाटील :-**

काय फरक पडतो? मिटींग चालेल, सभागृह चालेल.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, साफसफाईमध्ये संपुर्ण मिरा भाईंदरमध्ये आरोग्य खात्यावर जे ताशेरे ओढले जातात, तर मला असे वाटते की, येणाऱ्या बजेटमध्ये त्याच्यावर जास्त निधी वापरुन साफसफाईकडे संपुर्ण लक्ष मिरा भाईंदर महानगरपालिकेने द्यायला पाहिजे. कारण संपुर्ण मिरा भाईंदर शहर हे स्वच्छ आणि निरोगी राहिले पाहिजे. सभापती महोदय, आपण आरोग्याबाबत एक सभा लावा. त्या सभेत आपण विचार विनिमय करु या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटीलजी, आपण बोललात. परंतु, आपण कोणत्या कायद्यान्वये त्याच्या क्वेअरी आपण दाखवणार आणि आपण त्यांचा ठेका कॅन्सल करणार असे तुमच्या मताप्रमाणे जरी आम्ही चाललो किंवा आपल्या मताप्रमाणे आपण चालवले जर एखादा ठेकेदार मंजुर केलेला आहे आणि आपण ह्या सभेमध्ये सांगितले की, हे ठेके सगळे नामंजुर. तर आपल्या त्याविषयी प्रशासनाला माहिती दिली पाहिले की, या कायद्यान्वये ह्या तुमच्या चुकी अन्वये आम्ही तुमचा हा ठेका रद्द करत आहोत, ह्या ह्या क्लॉजप्रमाणे. कारण क्रमांक एक हा तुम्ही फुलफिल केला नाही. कारण क्रमांक सो ॲण्ड सो तो तुम्ही फुलफिल केला नाही. त्याच्यामुळे तुमचा ठेका का रद्द करु नये? अशा पद्धतीची आपण नोटीस देऊ शकतो आणि त्या ठेक्याबाबत आपण ह्या सभेला विषय ठेवू शकतो. म्हणून त्या संदर्भात तुम्हांला मी ह्या पद्धतीने बोललो की, आपण त्या विषयी त्याच्या ॲग्रीमेंटमध्ये असणाऱ्या त्या क्वेअरी ज्या असतील त्या व त्यांनी केलेल्या कामांमध्ये चुका याबाबत आपण अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन त्या चुका आपण या ठिकाणी सभागृहात मांडू या व त्या चुका मांडल्यानंतर आपण ठेका रद्द करण्याविषयी बोलू.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, मला असे बोलायचे आहे की, मी ह्या तीन सभेमध्ये त्याच विषयी बोलते. श्री. बावस्कर साहेब, श्री. कांबळे, श्री. चाळके ह्यांना प्रत्यक्षात मी पार्श्वभुमी दाखवली नसेल तसे त्यांनी सांगावे. मग त्यांनी तुम्हांला रिपोर्टींग केलेच नाही का? मी जे बोलते त्या विषयाचे रिपोर्टींग प्रशासनाला, तुम्हांला केले नाही का? मला असे म्हणायचे आहे की, त्याचे उत्तर त्यांना द्यावे लागेल. मी त्यांना दाखवले होते, त्यांनी काय काय येऊन बघितले होते? मी नुसते बोलते का? तो कोण आहे, काळा की गोरा मी अजून त्याला बघितले नाही. सांगावे त्याने मला बघितले असेल तर.

**रिटा शाह :-**

अधिकारी वर्ग फक्त सर्व्हे रिपोर्ट द्यायला एवढा वेळा घालवेल आणि तेही आरोग्याच्या विषयावर. मग आपण एखाद्याला निलंबित करा की, त्याने रिपोर्ट का दिला?

**प्रेमनाथ पाटील :-**

मेहता इस्टेटवाले आपल्याकडे आले होते असे मला वाटते. तो आमच्या प्रभागातलाच आहे. साहेब, तुमच्याकडे ते स्वतः इंडस्ट्रीवाले येऊन गेलेले आहेत. मग त्याच्यावरुनच आपल्याला माहिती पडत असेल की, प्रभागामध्ये किती साफसफाई होते की नाही?

**प्रभात पाटील :-**

जी इंडस्ट्री आपल्याला एवढे देते. आपल्याकडे इंडस्ट्रीचे एवढे मोठे उत्पन्न आहे. त्या एका इंडस्ट्रीमध्ये काय प्रकार आहे? ते जर कर्मचारी आणि इंडस्ट्री ओस पडले तर काय होणार आहे? प्रभागात रेसिडेन्स एरियामध्येसुद्धा तीच हालत आहे. डेंग्यु हा ईस्टमध्ये झाला आहे, वेस्टमध्ये झाला नाही.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपल्या परवानगी बोलतोय. आम्ही वाटतं त्यांनाही दाखवले होते. स्वतः डॉक्टरांनाही आम्ही दाखवले होते. कचऱ्याचे ढिगारे जसेच्या तसे एक-एक आठवडा तसेच पडलेले आहेत. एका आठवड्यानंतरही ते उचलले जात नाही. म्हणजे सभासद हे ज्या सभागृहात बोलतात त्याला काही किंमत नाही असे आम्हांला समजावे लागेल. एवढ्या पोटतिडकीने दोन महिने झाले त्या ह्याच विषयावर बोलत आहेत.

**मा. सभापती :-**

पण तुम्हांला मी रुलिंग दिली की, सभे अगोदर त्याची सभा बोलावून घेतो आणि आपण ते करुन घेतो.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, आपण आरोग्य खात्याविषयी स्थायी समितीमध्ये विषय घेऊन सभा लावण्यांत यावी.

**प्रभात पाटील :-**

सभापती ह्या नात्याने तुमच्या पिरियडमध्ये आम्ही जास्त बोलतो. त्या विषयामध्ये मीच ठराव मांडणार आहे. त्या ठरावाची सुचक मीच आहे. ठराव देण्याविषयी पण आज मीच बोलते आणि तुमच्याच पिरियडमध्ये मी बोलते. मला तुमच्याकडूनच अपेक्षा आहे आणि आम्ही न्यायासाठी बोलतो, स्वतःसाठी नाही बोलत.

**मा. सभापती :-**

आपण त्या विषया संदर्भात बोलतो त्याचे ॲग्रीमेंट आणि त्याच्या कामाचा संपुर्ण अहवाल घेऊन आपण सन्मा. सदस्यांना, अधिकाऱ्यांना बोलावून आपण एकत्र बसून त्याचा ठेका रद्द करणेबाबत आपल्याला ज्या काही त्रुटी भेटल्यानंतर आपण ह्या सभागृहामध्ये त्या विषयावर ॲक्शन घेऊ.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, प्रभाग क्र. १२ आणि १३ या प्रभागामध्ये जी साफसफाईची मोहिम चालू आहे त्याच्यामध्ये मी डॉ. बावस्करांकडे कमीत कमी एक महिना झाला मी पत्र दिले होते. येथे जे १११ मजूर अपुरे पडतात तर तुम्ही कमीत कमी ५० मजूर वाढवून द्यावे असे मी सांगितले आहे. मी एक महिना अगोदर पत्र दिले आहे आणि कमिशनर साहेबांनाही भेटलो. आता हे जे संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान चालू आहे त्याच्यात हे जे १११ मजूर आहेत त्याच्यातूनच ३२ मजूर घेतले आहेत. त्यामुळे एका ठिकाणी साफसफाई होते तर एका ठिकाणी साफसफाई होत नाही. तिथलीच लोक घेतल्यामुळे मजूर कमी पडतात. मी तुम्हांला सांगू इच्छितो की, मला प्रभाग क्र. १२ आणि १३ मध्ये ५० मजूर वाढवून द्यावे.

**प्रभात पाटील :-**

आपण मागच्या वेळी सफाईच्या विषयाबाबत असे बोललो होतो की, पल्स पोलिओच्या कर्मचाऱ्यांचा जो आठवडा जातो. तेवढे कर्मचारी आपल्याकडे कमी होतात आणि त्या आठवड्यामध्ये अगदी वन फोर्थ सुद्धा कर्मचारी नसतात. पुन्हा ह्या वेळेला तो विषय होऊनसुद्धा ह्यावेळेला तेच झाले की, आठवडाभर कर्मचारी सफाई कामाला नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रभात पाटीलजी, मागच्या वेळेला सांगितले होते की, असे जे आपल्याकडे कर्मचारी असतील ते कर्मचारी आपण आपल्याकडे दिले तर त्या कर्मचाऱ्यांना आपण आठ दिवस काम देवू आणि त्याचा त्यांना मेहनतानाही देवू. अशा पद्धतीचे आपण बोललो होतो. तर ह्या सर्व सन्मा. सदस्यांना ह्या विषयाबाबत मी असे पुन्हा सांगू इच्छितो की, असे आपल्याकडे जे कर्मचारी असतील ते कर्मचारी आपण उपलब्ध करुन घ्या. पल्स पोलिओच्या अगोदर त्यांना आपण शंभर रुपये देऊ. म्हणजे तिथे आपला कर्मचारी काम करेल. तो विषय मी ह्या करिता मुद्दाम ठेवला की, आपल्याच प्रभागातील नगरसेवकांनी ते कर्मचारी दिले तर त्या तिथे नगरसेवकांबरोबर प्रतिनिधी नागरिक कर्मचारी राहतील.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेब, हे जे आपले विषय संपले तर ह्या साफसफाई आणि डेंग्युचे गांभिर्य समजून तुम्ही आयत्या वेळेच्या विषयामध्ये चर्चेत घ्या. हे जे आपले अधिकारी आपण करोडो रुपये खर्च करुन ठेके दिलेले आहे आणि करोडो रुपये आपण स्वच्छता अभियानाला खर्च केलेले आहेत. तरीसुद्धा आपले अधिकारी म्हणजे जो आपला स्टाफ आहे तो अधिकारी आपण स्वच्छता मोहितेवर राबविलेला आहे आणि त्या लोकांनी एकदम असे रिपोर्ट दिलेले आहेत. ते भयंकर खराब रिपोर्ट दिलेले आहेत. हा माझा आक्षेप आहे. त्या लोकांनी भयंकर खराब रिपोर्ट दिलेले आहेत. ते रिपोर्ट आपण ताबडतोब सभा झाल्यानंतर सादर करायला लावा. कसे काय स्वच्छता अभियान चालू आहे आणि आपले सॅनेटरी इन्स्पेक्टर काय करतात आणि आपण जे नेमलेले अधिकारी आहेत ते काय स्वच्छता करतात? हे आपल्याला त्यांच्या रिपोर्टवरुन लक्षात येईल. हे आता आपले विषय झाल्यानंतर अर्ध्या तासाची चर्चा ह्याच्यावर होऊ द्या आणि त्यांचे रिपोर्ट तुम्ही मागवून घ्या की, त्यांनी काय रिपोर्ट दिले आहेत. त्याच्यानंतर हे आपल्या स्थायी समितीला समजेल की, आपण करोडो रुपये खर्च केलेले आहेत. ते आपले पाण्यात जातात की, वर तरतात? त्यांचे गांभिर्य तुम्ही घ्या आणि जो तुमचा अधिकार आहे त्याप्रमाणे तुम्ही करा.

**मा. सभापती :-**

ते जे रिपोर्ट आहेत, ते रिपोर्ट आपण सभेनंतर येथे ठेवा आणि सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी ह्यांनी जो प्रस्ताव मांडला, उपायुक्त साहेब, डेंग्युची साथ चालू आहे असे जे वातावरण मिरा भाईंदर शहरात आहे आणि संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानही सुरु आहे. त्या संदर्भामध्ये आपल्याला जर

माणसे जास्तीत जास्त घेता येतील, किमान प्रत्येक प्रभागामध्ये आपण आता काय करतो ह्या प्रभागात जी माणसे आहेत त्यांना आपण घेऊन जातो आणि तिथे साफसफाई झालेली नसते. परंतु, ते पुन्हा साफसफाईला आल्यानंतर तिथे कचऱ्याचा लोड वाढतो. त्या विषयाने आपल्याला स्वच्छता अभियानाच्या अंतर्गत जेव्हा आपल्याला शासनाचा कार्यक्रम मिळतो त्यावेळेला ज्या पद्धतीने पल्स पोलिओला आपण ज्या माणसांना नेमतो, ही जी आपण तरतुद करतो तशी तरतुद आपण स्वच्छता अभियान होते तेव्हा शासनाकडून आपल्याला वेळोवेळी रॅली काढा, हे करा असे निर्देश होतात. ती ही माणसे आपण ह्या ठिकाणी भरुन त्या संबंधी प्रत्येक वॉर्डामध्ये किमान दहा-दहा लोकांना ठेवून ते आपण प्रावदान करा.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, आपण स्वच्छता अभियान मोहित चालू केलेली आहे, संत गाडगेबाबा. त्याच्यात जो कचऱ्याचा ढेर असतो तोही आपण उचलतो आणि त्याच्याबरोबर हातगाड्या कुठे फिरतात त्यांनाही उचलतात. बांधलेल्या गाड्या उचलून आणतात. त्याचा खुलासा करावा. रस्त्यावरची गाडी उचलतात पण घराच्या दाराच्या पाठीमागे बांधलेली खाली गाडी उचलून आणतात.

**मा. सभापती :-**

मघाशी जे सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी ह्यांनी जे आरोग्य विषयी आपल्याला बोलायचे आहे. आपण त्या संदर्भात सभेनंतर ताबडतोब त्याच्यावर विषय घेऊ.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, स्थायी समितीची सभा संपल्यानंतर आपण प्रत्यक्ष स्थायी समितीने त्याची पाहणी केली. जिथे संत गाडगे महाराज अभियान चालू आहे तिथे आपण प्रत्यक्ष पाहणी केली तर बरे होईल. येथे सर्व सदस्य व अधिकारी आहेत.

**मा. सभापती :-**

आपण ह्याच्यावर चर्चा करु आणि चर्चेनंतर ठरवू.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, मागच्या वेळेला आपण ठरवले होते की, संबंधित अधिकारी स्थायी समिती म्हणजे हायर ऑथोरिटी आहे. मागच्या वेळेलाही आपण सांगितले होते की, जे अधिकारी आहेत, मुख्य अधिकारी आहेत. ते ह्या स्थायी समितीत हजर राहिलेच पाहिजे.

**मा. सभापती :-**

आपण सभेत उशिरा आलात. सभा चालू करतांना सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करतांना मी बोललो की, स्वच्छता अभियान सुरु असल्यामुळे काही अधिकारी काही कारणाने प्रभागात आहेत. त्याची नोंद घेण्यांत यावी असे मी सांगितले होते.

**प्रभात पाटील :-**

ह्यांच्या मुद्याला धरुन बोलते. स्थायी समिती ही फायनल ऑथोरिटी असते. कारण जेव्हा येथे सदस्य डेंग्युसारखा विषय उपस्थित करतील ह्याची कल्पना निदान डॉ. बावस्कर साहेबांना असणे आवश्यक होते. त्यांनी येथे उपस्थित राहणे अतिशय गरजेचे होते.

**मा. सभापती :-**

म्हणून श्री. शिंदे आणि श्री. कांबळे ह्यांना येथे आवश्यक उपस्थित रहा असे सांगितले. कारण खरोखर प्रत्यक्ष प्रभागामध्ये काही लोक गेले आहेत. बावस्कर साहेब कुठे गेले? त्यांनी उपस्थित राहायला पाहिजे होते. मी असे आरोग्य विभागाला बोललो होतो.

**प्रभात पाटील :-**

ते डॉक्टर आहेत, ह्या हिशोबाने त्यांनी येथे उपस्थित राहायला पाहिजे होते.

**रिटा शाह :-**

जर श्री. शिंदे आणि श्री. कांबळे हेच काम करुन घेणार तर डॉ. बावीस्कर साहेबांची गरज कुठे आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, जर ह्या विषयाचे गांभीर्य समजले असते आणि आजची सभा पुढे घेण्यात आली असती तर त्याला आमची हरकत नव्हती. आपणही त्यांच्या मदतीला गेलो असतो.

**रिटा शाह :-**

आपण त्यांना पन्नास हजार रुपये पगार देतो.

**प्रभात पाटील :-**

आपण त्यांना पैसे देतो, तर त्यांनी आम्हाला समाधानकारक उत्तर देणे आवश्यक आहे.

**गजानन भोईर :-**

ही सभा एवढी महत्वाची नव्हती, आपण आणखीन सात दिवस ही सभा पुढे ढकलली असती.

**मा. सभापती :-**

आपण याबाबत पुढे बोलतो.

**प्रभात पाटील :-**

पण ते कुठे गेले हे आम्हाला कळेल का?

**मा. सभापती :-**

डॉ. बावीस्कर कुठे गेले?

**राजकुमार कांबळे :-**

ते दुपार नंतर येणार आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

येथे डेंग्युचा आजार आणि हे भटकतील तर कसे चालेल?

**प्रभात पाटील :-**

ते सभा झाल्यानंतर येणार कारण तेव्हा सर्व सदस्य हे निघून गेलेले असतात. आता त्यांच्यावर वार झाले असते ना!

**रिटा शाह :-**

साहेब, विधी सल्लागार कुठे गेलेत तर त्यांना कोर्टाचे काम आहे व त्यांनी मला विचारुन गेले असे आपण सांगितले पण ठिक आहे त्यांनी आपल्याला विचारुन गेले पण सभेचे काय? नेहमी नेहमी त्यांना काही काम असेल तर त्यांनी यायचे नाही आणि तुम्हाला विचारुन गेले तर तुम्ही परत त्यांना परवानगी देत रहा. आपले विषय रेंगाळत राहणार. आपण नुसते येथे बसायचे.

**मा. सभापती :-**

मॅडम, आपण हा प्रश्न पहिल्यांदा विचारला होता आणि पुन्हा आपण परत तोच प्रश्न विचारता. ही तुमची पध्दत बरोबर आहे. पण तुम्ही हा प्रश्न विचारला आणि तुम्हाला ह्या प्रश्नाचे उत्तर दिले आणि तुम्हाला अगोदर ही कल्पना दिली होती, तरी आपण पुन्हा विचारता.

**रिटा शाह :-**

आता ह्याचे उत्तर द्या की बावीस्कर साहेब कशाला आले नाहीत.

**राजकुमार कांबळे :-**

त्यांचा फोन आला होता की, दुपारनंतर येतील.

**रिटा शाहः-**

फोन आला, पण ते कुठे गेले ते सांगा.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, फक्त एवढेच बोलते की शहरामध्ये डेंग्यू सारख्या भयंकर रोगाचे थैमान असताना डॉ. बावीस्कर हे स्थायी समितीच्या सभेला सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्याकरीता उपस्थित न राहील्याबद्दल मी स्वतः वैयक्तिकरित्या त्यांचा निषेध करते.

**रिटा शाह :-**

ह्या निषेधाला माझे अनुमोदन आहे आणि आपले जे विधी सल्लागार आहेत तर मला वाटतेही पाचवी सभा आहे, आणि तो विषय आपला रेंगाळत राहिलेला आहे. ते काही ना, काही कारणास्तव गैरहजर राहतात. तुमची परवानगी राहतात की, कसे राहतात ते मला माहीत नाही त्यांचा ही मी निषेध जाहीर करते.

**प्रभात पाटील :-**

ह्याला माझे अनुमोदन आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, त्यांनी जो निषेध केला त्या निषेधाबद्दल मी असे बोलतो की, त्यांना प्रशासनाने कारणे दाखवा नोटीस बजवावी की ते का गैरहजर राहीले, तुम्ही तसा कमिशनर साहेबांना निर्देश करा की कारणे दाखवा नोटीस बजवावी की तुम्ही सभेला का उपस्थित राहिले नाही. आज डेंग्यू सारख्या महत्त्वाच्या विषयावर येथे चर्चा आहे. सगळे प्रशासन, सगळे अधिकारी तुम्ही रस्त्यावर उतरविले तर हा महत्वाचा अधिकारी जो आज सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्याकरीता का उपस्थित राहीले नाही?

**प्रभात पाटील :-**

आम्ही निषेध करतो आपण निषेधाचा ठराव मंजूर करा ना!

**अशोक पाटील :-**

ते कुठल्या प्रशासकीय कामकाजाकरीता गेलेले आहेत का? प्रशासनाने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजवावी.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटील साहेबांनी जो मुद्दा उभारलेला आहे. त्या मुद्याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ते जर प्रशासनाच्या कामानिमित्त बाहेर गेले नसतील तर त्यांना जरुर कारणे दाखवा नोटीस द्या.

**प्रभात पाटील :-**

साहेब, ते आता नक्कीच प्रशासनाच्या कामाला गेले होते म्हणून तुमच्याकडे कागदपत्र सुपूर्द करतील, असे नाही ना!

**मा. सभापती :-**

पण ते प्रशासनाच्या कामाला गेले असतील तर तुम्ही त्यांना काय करणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभेच्या वेळेलाच कसे कामाला जातात.

**प्रभात पाटील :-**

आता ते सांगणारच ना, आम्ही येथे गेलो, तेथे गेलो होतो. नसतील गेले तरी सांगतील येथे गेलो होतो.

**मा. सभापती :-**

त्यांच्यावर कारणे दाखवा नोटीस तुम्ही काढून घ्या.

**प्रभात पाटील :-**

ह्याची सगळ्यांनी नोंद घ्यायची आहे की, कायदेशीर कार्यवाहीची नोटीस काढण्यात आली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती महोदय, कायदेशीर जी नोटीस द्याल त्याची प्रत आम्हाला प्रत्येक सदस्याला देण्यात यावी.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, येथे दोन-तीन मुद्यांचा खुलासा मघापासून करायचा होता. सन्मा. सदस्या रिटा शाह, अशोक पाटील, प्रभात पाटील, व मिलन पाटील ह्यांनी दोन-तीन विषय उपस्थित केले. एकेकांचा खुलासा करतो, ह्याच्यात सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी जो विषय घेतला होता की, जे काल रिपोर्ट आले ते रिपोर्ट भयानक आले. ह्या लोकांनी जी माहिती दिली त्यांच्याशी मी सहमत आहे कारण काल या ठिकाणी मी सर्व कर्मचाऱ्यांची सभा घेतली. विभाग प्रमुख, संबंधित इंजिनिअर, संबंधित नगररचनेचे अभियंते आणि अतिक्रमणचे इंजिनिअर या ठिकाणी नेमले होते. त्या त्या विभागाच्या प्रमुखांनी माहिती उपलब्ध करुन दिली ती भयानक आहे. मिलन पाटील साहेबांनी आता जो मुद्दा उपस्थित केला ते प्रत्यक्षात आपले जे कर्मचारी ठेक्यात दिले आहे, आपण कंत्राट पद्धतीचे काम दिले आहेत जे काम व्हायला पाहिजे ते काम झालेले नाही त्यामुळे तुमच्या मताशी आम्ही सहमत आहोत. त्याठिकाणी काम होणे जरुरीचे आहे आणि ह्याला मी परत सुचना दिल्या आणि आज मी परत सकाळपासून त्या वार्डात होतो. मी आज समक्ष पाहणी म्हणजे स्थायी समितीच्या सभेला यायच्या पूर्वी त्या वार्डात होतो. प्रत्यक्षात गटारी आता साफ केलेल्या आहेत. त्या गटारी कधीही साफ केलेल्या वाटत नाही. आता आपली मोहिम सुरु आहे त्याच्यात कोणाची जबाबदारी आहे, काय जबाबदारी आहे हा माझ्या ज्यूरीडेशनच्या बाहेरचा प्रश्न आहे. त्याच्याबद्दल मला कोणतेही कॉमेंट करायचे नाही. परंतू अभियाना अंतर्गत आम्ही काम चालू केलेले आहे. मा. सभापती महोदयांना ,मी विनंती करेन की, जे काम चालू केले आहे ते आम्ही निश्चितपणे चांगल्या पध्दतीने करु व जे काम झालेले नाही त्याबद्दल जो यथावकाश जो निर्णय घ्यायचा आहे त्याच्याबद्दल सभापती साहेब आणि आपण जो निर्णय घेणार कारण आपण ह्या समितीचे अंतिम अधिकारी आहात.

**प्रभात पाटील :-**

पहिल्यांदा ह्या महानगरपालिकेत प्रशासकीय अधिकारी स्पष्ट आणि चांगले बोलले आहे. आम्ही त्याचे अभिनंदन करतो.

**मिलन पाटील :-**

आम्ही उपायुक्त रणखांब साहेबांचे अभिनंदन करतो असा अधिकारी आमच्या महानगरपालिकेला मिळाल्याबद्दल मी सर्वांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो आणि स्पष्ट वक्ता स्पष्ट अधिकारी मिळाल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

**गजानन भोईर :-**

सगळ्या सदस्यांकडून आपले अभिनंदन करतो.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

अभिनंदन वगैरे काही नको पण जे काही फॅक्ट आहे ते माझे मी करतो आणि ते काम मी आपल्यासमोर मांडत आलो आहे आणि पुढे ही मांडणार आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, एवढा गंभीर विषय प्रशासनाने, उपायुक्त साहेबांनी मांडलेला आहे, तर तुम्ही हा विषय अरजन्टली ह्या सभेत घ्या आणि हा ठेका रद्द करण्याच्या सदंर्भात आपल्याला काहीतरी कार्यवाही करावी लागेल.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आणि दुसरा मुद्दा त्यांचे रिपोर्टदेखील आलेले आहेत. ते रिपोर्ट यथावकाश मा. सभापती साहेबांकडे मी पाठवतो आणि दोन दिवसानंतर आम्ही परत सभा घेणार त्यावेळी सभापती साहेबांना जर शक्य झाले आणि त्यांनी ह्या सभेला आलात तर प्रत्येक विभागप्रमुख जे आरोग्यखात्याच्या व्यतिरीक्त नेमलेले आहेत त्यांना संपूर्ण माहिती दिली जाईल, की प्रत्यक्षात काय काय झालेले आहे, काय काम व्हायला पाहिजे आणि काय काम झालेले नाही.

**मिलन पाटील :-**

आपली सभा झाल्यानंतर आपण आम्हाला त्याचा अहवाल द्या. जे काही अहवाल उपलब्ध असतील ते द्या.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

लेखी अहवाल मिळतील व प्रत्यक्ष समक्ष देखील ते सांगू शकतील.

**मा. सभापती :-**

आपल्याला ह्याच्यात जो अहवाल किंवा माहिती पाहिजे असेल ते आपल्याला मिळेल आपण ती माहिती नंतर घेऊ.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे. याविषयावर तुम्ही लवकर एक खास सभा लावा. आपल्याला लवकरात लवकर त्याची कारवाई करणे भाग आहे. ते क्रमप्राप्त आहे. आपण आरोग्याविषयी खास सभा लावा अशी मी मागणी करत आहे.

**मा. सभापती :-**

सदर विषयाची विशेष सभा लावण्यात येईल.

**रिटा शाहः-**

साहेब, आरोग्यविषयी मी एक महत्वाची सुचना मांडु इच्छिते.

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेबांना पूर्ण बोलू द्या नंतर आपण बोला.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

पहिला मुद्दा सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांच्या विषयी झाला आणि दुसरा मुद्दा सन्मा. सदस्य रिटा शाह, अशोक पाटील आणि प्रभात पाटील ह्यांनी मांडला होता जो स्थायी समितीच्या फंक्शनींगबद्दल, कार्याबद्दल ह्याच्यामध्ये आपण जो मुद्दा उपस्थित केला होता रिटा शाह मॅडमकडे मी लक्षवेधू इच्छितो की, त्यांनी सांगितले होते जो ठराव मांडल्यानंतर पुढची काय प्रक्रिया आहे. ठराव मांडण्याचा पुर्णपणे अधिकार हा स्थायी समितीच्या सदस्यांना आहे. प्रशासन फक्त वस्तुस्थितीची माहिती त्या विषयाला अनुसरुन जी वस्तुस्थिती आहे त्या वस्तुस्थितीची माहिती देते. पण त्याचा निर्णय आपण घ्यायचा आहे आणि त्यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला होता की, तुम्ही ताबडतोब त्यांच्या अनुषंगाने ठराव लिहून आणता तर मॅडम प्रत्यक्षात महाराष्ट्रातील बहुतांश महानगरपालिकेत, नगरपालिकेत हीच प्रथा आहे आणि जर त्याच्यात तुम्हाला काही सुधारणा करायची असेल तर सुधारणा करुन आपण त्या ठरावावर सही करा आणि सही जरी नसेल तरी त्याचे इम्पलिमेंट आपण करु शकतो त्याचे कारण असे की ऑलरेडी आपण त्याला सुचक , अनुमोदक दिलेले असते आणि ते रेकॉर्डला त्याचा पुरावा आपल्याकडे उपलब्ध असतो. तसेच मागच्याच मुद्याला घेऊन आपला दुसरा

उद्देश मी ह्या ठिकाणी खुलासा करतो की, मागच्या ठरावात आपण त्याला अनुमोदन दिले होते आणि त्याला दुस-याची सही झाली होती. परंतू ते उघडकीस येऊ शकते. कारण आपल्याकडे रेकॉर्डींग उपलब्ध आहे त्यामूळे त्याच्यात सहीची जी फॉरमलीटी आहे, प्रत्यक्षात सुचक अनुमोदक आपण दिलेले आहे, ठराव आपण ज्यावेळी मांडल्यानंतर आम्ही ठराव ताबडतोब देऊ. आपल्याला जर योग्य वाटत नसेल कारण आपण फक्त सही करायची नाही तर तो वाचून सही करायची असते आणि त्याच्यात जर आपल्याला योग्य वाटले नाही तर आपण सही करु नका किंबहूना सही नाही केली तरी त्याचे इम्पलिमेन्टेशनमध्ये जे जे मुद्दे त्याच्यात घेतले त्याचे इम्पलिमेन्टेशन आपण करायला पाहीजे आणि आपली सही घेतली नाही हा नंतरचा मुद्दा आहे. त्याच्यावर मी या ठिकाणी खुलासा करु शकत नाही कारण तो ज्युरीडेशनचा भाग नाही.

**मिलन पाटील :-**

पेमेन्ट झालेले आहे त्याच्या बाबतीत काय? त्याचा तुम्ही खुलासा केला नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तो माझ्या ज्युरीडेशनच्या बाहेरचा प्रश्न आहे त्यात मी खुलासा करु शकत नाही

**मिलन पाटील :-**

ऑडीटर आहेत त्यांनी सुद्धा चेक केले असेल की नाही?

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेबांना पूर्ण खुलासा करु द्या, नंतर मी तुम्हाला त्याचे उत्तर देतो.

**मिलन पाटील :-**

म्हणजे त्याने आयुक्त साहेबांना चुकीची माहिती दिली.

**प्रभात पाटील :-**

तो प्रश्न नंतर विचारायचा आहे, ऑडीटर साहेबांना. तो प्रश्न आपण राखून ठेवा, त्यांना नंतर विचारु.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटील साहेबांनी जे विचारले होते की, ह्याच्यात अंतिम अधिकार कोणाचा आहे तर अंतिम अधिकार हा पूर्णपणे स्थायी समितीच्या सदस्यांचा आहे. त्याच्यात तुमच्या धोरणानुसार आम्ही काम करतो त्याच्यात प्रशासनाला कुठल्याही प्रकारचा ठराव मांडण्याचा अधिकार नाही. ठराव हा सन्मा. सदस्यांकडून मांडला जाईल.

**प्रभात पाटील :-**

साहेब, माझा प्रश्न असा की, जसे सन्मा. सभापती साहेबानी सांगितले की बहूतांश महानगरपालिकांमध्ये तो ठराव जो ताबडतोब किंवा लगेच सही घेतली जाते. काही महानगरपालिकेंच्या संदर्भामध्ये नंतर प्रोसिडींग मंजूरीच्या वेळी घेतली जाते, तर कायद्यात काय म्हटले आहे?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपण मला विषय समजावून सांगा, मला समजले नाही.

**प्रभात पाटील :-**

येथे एखाद्या संबंधित विषयाचा ठराव झाला तर लगेच त्याच्यावर सुचक व अनुमोदकाची सही घेतली जाते. सभापती साहेबांनी असे सांगिले की, बहूतेक महानगरपालिकेत असे होते. तर काही महानगरपालिकामध्ये इतिवृत्तांताच्या वेळी सही घेतली जाते. पण स्थायी समितीच्या संदर्भात कायद्यात काय आहे?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

कायदा हा सर्व महानगरपालिकांना एकच आहे. कायदा महानगरपालिका व्हाईस वेगवेगळा नाही. परंतू आपण सही त्याचवेळी करायची असते आणि सही करतो ह्याचा अर्थ त्याच्यामध्ये जे लिहिले आहे त्याची आपल्याला मान्यता आहे. प्रत्यक्षात ते काहीतरी लिहीतात आणि आमची सही घेतात. सही आपण करतो याचा अर्थ त्याच्यात जे काही लिहीले आहे त्याला आपली मान्यता आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण जे बोलतात ते मला मान्य आहे पण त्यात एवढीच कन्फ्युजन आहे की, एखादा ठराव जर मी मांडला, ते त्यांनी आणले की, ह्याच्यावर सही करा आणि मला ते पटलं नाही की, ह्याच्यावर ते व्यवस्थित लिहिले नाही. तर मी स्वतः तो ठराव लिहून देऊ शकते ना?

**अशोक पाटील :-**

ठराव तुम्ही मांडायचा तो ठराव तुम्ही लिहून देवू शकता.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तसे ते काम तुम्हीच करायचे असते पण आम्ही तुम्हाला आमचे सहकार्य देतो.

**रिटा शाह :-**

आमचा अधिकार आहे. तर आम्हीच ठराव आणणार ते तुम्ही आम्हाला सही करायला आणून द्यायचे नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ते तुम्ही जरी करत असाल, ते तुम्ही हाताने लिहू शकणार नाही म्हणुन आमचा कर्मचारी, आमचा स्टाफ ते आपल्याला तयार करुन देतो.

**रिटा शाह :-**

साहेब आपण एका बाजूला असे सांगतात की तुमच्या सह्या आणि तुम्ही ठराव करु शकता.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तुम्ही त्याच्यात करेक्शन करु शकता.

**रिटा शाह :-**

मी तुम्हाला तुमच्याच प्रश्नाचे उत्तर देते की, तुम्ही काय सांगितले तुम्ही एकदा सुचना मांडली आणि ठराव झाला की तुम्ही त्या ठरावावर जरी सही केली नाही तरी ते इम्प्लिमेन्टेशनला जाणार म्हणजे आमची सही महत्त्वाची नाही की सही करायलाच पाहिजे. मी तुमच्यावर कुठलेही एलिगेशन मांडत नाही पण समजा मी ठराव मांडला तो ठराव खांबित किंवा आरोग्य विभागाचे कांबळे ह्यांनी तो ठराव माझ्याकडे आणले तर मी त्यांना असे बोलू शकते की, जो ठराव मांडलेला आहे तो ठराव मी तुम्हाला लिहून देते, तो माझा अधिकार आहे.

**मा. सभापती :-**

हे बरोबर आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सभापती साहेबांनी हे मान्य केले आहे.

**मा. सभापती :-**

ठराव आपणच मांडायचे आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम हे सभापती साहेबांनी मान्य केले आहे त्यामूळे आणखीन आता वेगळे काही रुलिंग देण्याची आवश्यकता नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, सहा, सात महिने आपण जे मागे जे उंदिर मारण्याचे औषध आणलेले आहे.

**मा. सभापती :-**

तो विषय आता येथे येत नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, हे एवढेच गाजलेले आहे. आपण ह्याची देखील चौकशी करा. त्याच्यात एक्सपायरी डेटची आपण औषधे आणलेली आहेत आणि ते पकडून तिथे डबा ठेवलेला आहे.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११३ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

या सभेला अधिकृतरित्या सुरुवात करण्या अगोदर मी आजच्या ह्या स्थायी समितीपुढे एक लक्षवेधी ठेवू इच्छितो. मघाशीच आपले उपायुक्त (मुख्यालय) अत्यंत प्रभावीपणे बोलले आणि सर्व सन्मा. सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि खरोखरच ते अभिनंदनास पात्र होते. कारण प्रशासनाच्या कामकाजाच्या बद्दल बोलणारा एवढा स्पष्ट वक्ता मला वाटत नाही की, ह्याच्या आधी एखादा अधिकारी बोलून गेला असेल. आपले उपायुक्त कल्याण केळकर साहेब तेसुद्धा प्रभावीपणे बोलायचे. परंतु, ते काही वेळा भावनावश व्हायचे. परंतु, येथे बोलताना तुम्ही बघितले असेल, प्रशासनाच्या कामकाजाबद्दल ज्या त्रुट्या आहेत त्या त्यांनी संपुर्णपणे सभागृहासमोर आणल्या होत्या. सभागृहातर्फे मी पुन्हा एकदा त्यांचे अभिनंदन करतो. दुसरी गोष्ट, आपले जेष्ठ सदस्य मिलन पाटील हे बोलताना बोलायच्या ओघामध्ये एक गोष्ट बोलून गेले की, एखाद्या सदस्याला जर डेंग्युची लागण झाली तर मला वाटते आपण काही वाईट वाटून घेऊ नका. परंतु, त्याही पलीकडे जाऊन मी सांगेन की, सन्मा. सदस्य मिलन पाटील आपण सहा लाख लोकसंख्येचे ७९ नगरसेवक प्रतिनिधीत्व करत आहोत. जेवढे स्वतःचे आरोग्य आपल्याला महत्वाचे आहे तेवढेच शहरातील प्रत्येक नागरिकाचे आरोग्य आपल्याला महत्वाचे

आहे. तर मी तुमच्या मताशी काही बोलत नाही. परंतु बोलण्याच्या ओघात ते बोलून गेले. कारण नागरिकांचे प्रतिनिधीत्व आपण करत आहोत. मागच्या काही दिवसामध्ये वृत्तपत्रामध्ये काही बातम्या आल्या, डेंग्युच्या लागणबद्दल. आपलेच सहकारी नगरसेवक शरद पाटील, त्यांच्या प्रभागात ही घटना घडलेली आहे. प्रशासनाने प्रशासनाच्या वतीने ज्या काही गोष्टींची आवश्यकता आहे, ज्या काही खबरदारी घ्यायला पाहिजे होत्या त्या घेतलेल्या आहेत. त्याही पलीकडे जाऊन मी सांगेन मा. महापौर आणि मा. स्थायी समिती सभापती ह्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व सन्मा. सदस्यांना मी विनती करेन की, प्रशासन डेंग्युच्या साथीच्या रोगाबद्दल ज्या काही कारवाया आणि जी काही मोहिम राबवित आहेत त्या मोहिमेमध्ये प्रत्येक सभासदाने आपआपल्या प्रभागामध्ये तेवढ्याच आत्मियतेने काम करा. जेणे करुन ह्या रोगाचा प्रादुर्भाव इतर लोकांना होऊ नये आणि शहरातील लोकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये. तर मी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करेन की, त्यांनीसुद्धा ह्या कामी प्रशासनास योग्य सहकार्य करावे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, मी एक अभिनंदनाचा ठराव मांडतोय. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त साहेब यांना येथे दोन वर्षे पुर्ण झाल्यामुळे सभागृहाच्या वतीने सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचे मी अभिनंदन करतो. त्यांची वाटचाल अशीच यशस्वी व्हावी.

**अभिनंदन ठराव क्र. १२२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त साहेब यांना येथे दोन वर्षे पुर्ण झाल्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे. वाटचाल अशीच यशस्वी व्हावी.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर. अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**केशव घरत :-**

५४ बेलापूर मतदार संघाचे म्हणजे आपल्या मतदार संघाचे नामदार मा. गणेशजी नाईक साहेब ह्यांची ठाणे जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नेमणुक झाल्याबद्दल मी येथे अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. १२३ :-**

५४ बेलापूर मतदार संघाचे म्हणजे आपल्या मतदार संघाचे नामदार मा. गणेशजी नाईक साहेब ह्यांची ठाणे जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नेमणुक झाल्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. केशव घरत. अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**गजानन भोईर :-**

कोकण विभाग मतदार संघातून श्री. मोतेसर निवडून आल्याबद्दल मी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. १२४ :-**

कोकण विभाग मतदार संघातून श्री. मोतेसर निवडून आल्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. गजानन भोईर. अनुमोदन :- श्री. जोजफ घोन्सालवीस.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रिटा शाह :-**

साहेब, ९० नंबरचा ठराव जो आपण पेंडींग ठेवला होता त्याच्यावर माझे अनुमोदन आहे. त्याच्यावर रुलिंग झाले ना, प्रोसिडींग मंजुर करुन घ्यायचे?

**मा. सभापती :-**

ते इतिवृत्तांत सभेसमोर आणावे लागेल.

**रिटा शाह :-**

आपण ती प्रोसिडींग पेंडींग ठेवली होती.

**प्र. सचिव :-**

आपण तो ठराव क्र. ९० सोडून प्रोसिडींग मंजुर केली आहे.

**रिटा शाह :-**

तेवढे तुम्ही मंजुर केले ना? ते मंजुर झाले ना?

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय. प्रकरण क्र. ११३ जो दिला आहे त्यात जेसल पार्क चौपाटीवर दशक्रिया विधी व नुतनीकरणाचे काम खाजगी संस्थेला देण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेण्याबाबत. तर आपण हे खाजगी संस्थेला देण्यापेक्षा आपली महानगरपालिका हे काम करु शकत नाही का?

**मिलन पाटील :-**

माझ्या म्हणण्याप्रमाणे महानगरपालिकेने तो शेड उभारलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

महानगरपालिकेने शेड उभा केलेला आहे. फक्त दुरुस्तीचा खर्च आहे आणि तो खर्च महानगरपालिकेने करावा असा मी ठराव मांडत आहे.

**रिटा शाह :-**

अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

पण हे काम एखादी संस्था जर करत असेल व त्यात महानगरपालिकेचे पैसे वाचत असतील तर हरकत काय आहे?

**प्रभात पाटील :-**

पण ते कोणाला द्यायचे नाही. ते महापालिकेचे शेड आहे. महापालिका खर्च करेल.

**सुर्यकांत भोईर :-**

तिथे महापालिकेचे शेड आहे तर महापालिकेनेच तिथे बोर्ड लावला पाहिजे. तिथे संस्थेचा बोर्ड कशाला लागला पाहिजे?

**प्रभात पाटील :-**

तिथे एखाद्या संस्थेचा बोर्ड कशाला लागला पाहिजे? ते महानगरपालिकेचे आहे आणि महानगरपालिकेनेच ते काम करावे.

**गजानन भोईर :-**

मागे असाच विषय झाला होता. आपल्या टेम्बा हॉस्पीटलमध्ये प्रेत नेताना आणतांना हात-पाय तुटलेले असतात. तर आम्ही खांबीतजी ह्यांना सांगितले होते की, आपण अशा बंद गाड्या बनवू. तर आपण हे कोण संस्था असेल त्यांच्याकडे जाऊया. मग तशा गाड्या नगरपालिका का बनवत नाही? बंद गाड्या नगरपालिका का बनवत नाही? सभापती साहेब, आम्ही मागे बंद गाड्या टेम्बा हॉस्पीटलमधून रेल्वे लाईनमधून हात-पाय तुटलेले जे अपघाती माणसे येतात. ते उघड्यावर घेऊन जातात. त्यासाठी आम्ही सांगितले होते की, बंद गाड्या बनवा. म्हणून सांगितले की, आपण ते खाजगी संस्था देऊन टाका. मग ते आपली महानगरपालिका का बनवत नाही?

**प्रभात पाटील :-**

या विषया संदर्भात मी बोलते, मागच्या वर्षी येथे खांबित उपस्थित असतील आणि गेल्या वर्षीचे सदस्य उपस्थित असतील तर संपूर्ण जेसल पार्क चौपाटी डेव्हलप करण्यासाठी इव्हन गणपती विसर्जनाचा धक्का, प्लॅटफॉर्म म्हणजे पायऱ्या बांधण्यासाठी एक संस्था स्वखर्चाने पुढे आली होती.

दशक्रिया विधी करण्यापासून, शेड बांधण्यापासून, मंदिर बांधण्यापासून, गार्डन विकसित करण्यापासून त्यावेळेला ह्या स्थायी समिती सदस्यांनी त्यांना विरोध केला. मग आज तोच विषय दुस-या संस्थेला देण्याचा विषय घ्यायचाच कशाला? ते आपल्याला अप्रोच झाले होते. सन्मा. सभापती आपण त्यावेळेला होते.

**अशोक पाटील :-**

एक करोड रुपये त्यावेळेचे मंत्री महोदय देणार होते असा विषय आला होता.

**प्रभात पाटील :-**

असा विषय होता. पण येथे असा-तसा विषय त्यांनी आणला. ते समोरुन आले आणि ती संस्था ॲप्रोच झालेली. तेव्हा समोरुन असा विषय आला होता की, मंत्री महोदय एक करोड रुपये देणार होते. मग तेही आले नाही व आपण त्या संस्थेलाही दिले नाही आणि ते आज तसेच पडून राहिले आहे. परिणामी त्याची सगळी डागडुजी करण्याचा निर्णय आणि तिथे साहेब, आता डागडुजीच करायची आहे. सभापती साहेब मी ठराव मांडला आहे की, तिथे आता डागडुजी करायची आहे. तेव्हा आपण ते एखाद्या संस्थेला कशाला देतो? आपणच ते करुन घेऊ या.

**मिलन पाटील :-**

तिथे आपल्या महानगरपालिकेचेच नांव असू दे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने, प्रकरण क्र. ११३ वर येथे गोषवा-यात प्रशासनातर्फे स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, सदर शेडची जागा रेल्वेच्या पुलाकरिता गॅमन इंडियाने घेतल्याने सदर शेडचा वापर करता आला नाही. महापालिकेने शेडकरिता खर्च केला. त्याच्यानंतर ती जागा जर गॅमन इंडियाने घेतली तर नक्की त्या जमिनीची मालकी कोणाकडे? ह्याचा प्रशासनातर्फे खुलासा करण्यांत यावा.

**एन्. आर. शेंडे :-**

मुळात ती जागा शासनाची, जिल्हाधिका-यांची आहे आणि ती गॅमन इंडिया कंपनीला शॉर्ट टर्म लिझवर देण्यांत आलेली आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

जागेची मालकी जर आपल्या ताब्यात नसेल आणि जर आपण त्या संबंधित गोष्टीवर खर्च करणार असू, ऑलरेडी आपण खर्च केलेला आहे आणि आता एखादी सेवाभावी संस्था त्या कामाकरिता पुढे येत असेल आणि महापालिकेचा जर खर्च वाचत असेल तर प्रशासनाने व संबंधित स्थायी समितीने त्याच्यावर का विचार करु नये? जर जागाच आपल्या ताब्यात नाही. ठिक आहे, प्रभात ताईंनी सांगितले की, जे काही नुतनीकरणाचे जो काही खर्च आहे तो खर्च महापालिकेने करावा. पण जागेच्या मालकीबद्दल अजून साशंकता आहे. तर मला वाटते पुढे खर्चाच्या बाबतीतही आपल्याला विचार करावा लागेल.

**गजानन भोईर :-**

जर ते तोडले तर खाजगी संस्थेचे नुकसान होईल. त्यात आपल्या महानगरपालिकेला नुकसान होणार नाही.

**अनंत पाटील :-**

चांगल्या कामासाठी जर एखाद्या वस्तुचा उपयोग होत असेल.........

**गजानन भोईर :-**

ते चांगले काम आहे. त्याच्याने जवळच्या जवळ दशक्रिया विधी होईल.

**प्रभात पाटील :-**

तिथे आपला ऑलरेडी शेड आहे, नविन बांधायचा नाही, दुरुस्ती आहे.

**गजानन भोईर :-**

नविन बांधायचे आहे.

**प्रभात पाटील :-**

मी ठराव मांडलेला आहे आणि तो दुरुस्तीचा प्रश्न आहे, नुतनीकरणाचा प्रश्न आहे. नविन बांधण्याचा प्रश्न नाही. तिथे नुतनीकरणच करायचे आहे.

**मिलन पाटील :-**

नुतनीकरणाचाच विषय आहे.

**मा. सभापती :-**

सध्या वस्तुस्थिती काय आहे?

**दिपक खांबित :-**

तिथे ४०-५० हजार रुपये खर्च आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तो खर्च महानगरपालिकेला करु द्या. ४०-५० हजार रुपयांसाठी संस्थेचे नांव कशाला तुम्ही देता?

**गजानन भोईर :-**

ते तुटल्यानंतर महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

होऊ द्या ना. एवढे नुकसान होते त्याच्यात पन्नास हजार रुपये नुकसान होते त्याच्यात काय?

**गजानन भोईर :-**

४०-५० हजार रुपये तर साधी रक्कम नाही.

**प्रभात पाटील :-**

मी ठराव मांडलेला आहे. जेसलपार्क चौपाटीवर जो दशक्रिया विधी नुतनीकरणाचा त्याच्याबाबतीत जे नुतनीकरण करायचे आहे व जो खर्च आपल्याला दुरुस्तीसाठी करायचा आहे. सदरचा खर्च हा प्रशासनामार्फत म्हणजे महापालिकेमार्फत करण्यांत यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आमचा या ठरावाला विरोध आहे.

**गजानन भोईर :-**

या ठरावाला आमचा विरोध आहे. आपण आमचा विरोध नोंदवा.

**अनंत पाटील :-**

सभापती साहेब, दशक्रिया करण्यासाठी पुर्वेच्या ब-याचशा नागरिकांना पश्चिमेकडे यावे लागते आणि अशा अवस्थेत आताच खुलासा केला की, ती जागा आपल्या मालकीची नाही. आपण तिथे खर्च करु शकत नाही असा खुलासा केला असतांनासुद्धा तिथे महापालिकेने खर्च करावा हे दुर्दैव असे समजावे.

**प्रभात पाटील :-**

आपण ऑलरेडी खर्च केलेला आहे.

**अनंत पाटील :-**

ते काम एखादी संस्था करीत आहे आणि तिथे जे नुकसान होणार आहे ते सोसायला ती संस्था तयार आहे. अशा चांगल्या सुविधांना तुम्ही विरोध करु नका असे माझे म्हणणे आहे.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सभापती साहेब आता जो अनंत पाटील साहेबांनी विषय काढला की, आपली मालकी नसतांना नगरपालिका खर्च करते. तर असाच खर्च महानगरपालिका या मैदानावर देखील करते, नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर करते, ज्याच्यावर आपली मालकी नाही. तिथे आपण लाखो रुपये खर्च करतोय.

**सुर्यकांत भोईर :-**

जेसल पार्कला चौपाटी बनते त्याची देखील मालकी कुठे आहे? त्याच्यामध्ये देखील महानगरपालिकाच खर्च करते.

**गजानन भोईर :-**

त्याच्यासाठी विषय आला होता की, असा खर्च करु नका.

**जोजफ घोन्सालवीस :-**

असा पैसा आपण खर्च करु नका.

**अनंत पाटील :-**

असे जर असेल तर सुभाषचंद्र बोस मैदानावर आतापर्यंत जो खर्च झाला आहे, तर ह्याच्यापुढे असा खर्च करु नका.

**प्रभात पाटील :-**

जर अशी खर्चाची बाब असेल तर सालासर हनुमान सेवा मंडळ संपूर्ण जेसलपार्क चौपाटीचा खर्च उचलते, त्यांना तुम्ही परवानगी देणार? तर हा विषय पेंडींग ठेवा. पुढल्या वेळेला तुमच्यासमोर

विषय येतोय. ऑलरेडी एक वर्षापुर्वी तुमच्याकडे तो विषय आलेला आहे. नाहीपेक्षा मी ठराव मांडलेला आहे की, सद्यस्थितीत नुतनीकरणाचे काम महापालिकेमार्फत करण्यांत यावे.

**मिलन पाटील :-**

या ठरावाला अनुमोदनही झालेले आहे, अजून दुसरे काय पाहिजे?

**अनंत पाटील :-**

सभापती महोदय, जर अनाठायी गव्हर्नमेंटची जागा असतांना नगरपालिका तिथे खर्च करत असेल. सुभाषचंद्र मैदानाचे उदाहरण जर आता आपल्यासमोर आणले असेल तर ह्याच्यापुढे सुभाषचंद्र बोस मैदानावर जर तो खर्च अनाठायी खर्च असेल तर त्याची संपुर्ण जबाबदारी ही आपली राहिल असे मी सांगतो. अनाठायी जर तुम्ही खर्च करीत असाल तर.

**गजानन भोईर :-**

कुठल्याही सरकारी जागेवर.

**अनंत पाटील :-**

आपला पायंडा असा आहे की, जिथे चांगली सुविधा होत असेल त्या सुविधेला विरोध करायचा नाही. परंतु, तुम्ही नविन आणून कायदेशीर बाबींनी बोलत असाल तर त्या कायदेशीर बाबींवर आमच्या डोक्यावर माती कशाला? मग ते कुठलेही असू दे, सुभाषचंद्र बोस मैदान जरी असले तरी त्याला आम्ही हे करणार.

**मिलन पाटील :-**

तिथे सामाजिक कार्यक्रम होतो, तिथे मुले खेळण्याचा हा विषय आहे. ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

**गजानन भोईर :-**

ती महानगरपालिकेची जागा नाही.

**मिलन पाटील :-**

महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

**मा. सभापती :-**

ठराव झालेला आहे. पुढचा विषय घेण्यांत यावा.

**गजानन भोईर :-**

या ठरावात आपण आमचा विरोध नोंदवा. जर ह्याच्यात ह्या खर्चाबद्दल काही झाले तर सर्व जबाबदारी प्रशासनाची राहिल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ज्या जागा नगरपालिकेच्या मालकीच्या नाही त्याला जो तुम्ही खर्च कराल त्याची सर्व जबाबदारी प्रशासनाची. ह्याला आम्ही जबाबदार नाही.

**मा. सभापती :-**

सदर विषयाचा ठराव मांडलेला आहे आणि पुढचा विषय घेण्यापुर्वी सन्मा. सदस्य घोन्सालवीसजी जे वक्तव्य आपण या ठिकाणी केले, तर मिरा भाईंदर महानगरपालिकेत अशा बऱ्याचशा जागा आहेत आणि त्या जागा आपण ताब्यात न घेता लोकांच्या, नागरिकांच्या मागणीच्या दृष्टीकोनातून आपण उदा. भाईंदर पुर्वेची चौपाटी. या चौपाटीवर आपण गणेशोत्सव विसर्जनासाठी, नवरात्रीत मातेच्या विसर्जनाकरिता, जे बंगाली किंवा अन्य धर्मिय देवींचे देवतांचे विसर्जन होते त्याच्या दृष्टीकोनातून आपण धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आपण तिथे खर्च करत आहोत आणि तो खर्च करण्याकरिता आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध पक्षातील प्रमुख, विविध नगरसेवक, पदाधिकारी हे त्यांना सुचना करतात आणि त्यांच्या सुचनेवर आपण त्या ठिकाणी खर्च करत आहोत. त्यामुळे कोणत्याही सरकारी जागेवर खर्च केला की, नाही केला हा विषय वेगळा आहे. आज जो विषय आला होता हा विषय असा होता की, त्या ठिकाणी ऑलरेडी मिरा भाईंदर महानगरपालिकेने यापुर्वी तिथे शेड बांधलेले आहे आणि तो शेड बांधलेला असतांना त्या ठिकाणी त्या शेडला जाण्या-येण्याकरिता रस्ता नव्हता. कारण त्या ठिकाणी गॅमन इंडियाचे ब्रीजचे काम चालू होते आणि ब्रीजचे काम चालू असल्या कारणाने सन्मा. सदस्य अनंत पाटील ह्यांनी बोलल्याप्रमाणे ते वेस्टला जात होते. त्याला ती कारणे होती. कारण तिथे जायला रस्ता नव्हता आणि आजही ती जागा आहे ती जागा गॅमन इंडियाच्या अधिकाऱ्यांनी आपल्याला जी सुचना केली व जी माहिती दिली की, आजही ती जागा गॅमन इंडियाच्या त्यांना आपण ॲग्रीमेंट लीझवर जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेली आहे. त्यांच्या अखत्यारीमध्ये आजही ती जागा आहे आणि आता त्यांचे काम संपुष्टात येत आहे. म्हणून तशी ती जागा खाली होत आहे आणि जागा खाली झाल्या कारणाने त्या ठिकाणी काम करण्याचा प्रस्ताव आपण जो आणला होता

तो प्रस्ताव आपण मिरा भाईंदर महानगरपालिका ज्या पद्धतीने सर्व चौपाट्यांवर सर्व सरकारी जागेवर काम करत आहे आणि ते आपल्या माणसांचे काम करत आहे. म्हणजे आपल्या सन्मा. सदस्यांच्या प्रशासन आपल्या स्वतःच्या मनमानीने किंवा त्यांच्या सुचनेने करत नाही. जेव्हा एखादा सन्मा. सदस्य, सन्मा. पदाधिकारी त्या ठिकाणी सुचवितो की, या ठिकाणी काम झाले पाहिजे. त्या पद्धतीने भाईंदर पुर्व चौपाटीवर अनेक सदस्यांनी सांगितले की, या ठिकाणी रस्ता झाला पाहिजे, या ठिकाणी अशा पद्धतीने रेलिंग केले पाहिजे. त्यांच्या विनंतीवरुनच काम केलेले आहे आणि जर सन्मा. अधिकाऱ्यांनी आपल्याला सुचना केली, आपल्याला माहिती दिली तर त्या माहितीनुसार त्या ठिकाणी ऑलरेडी चौथरा आहे आणि तिथे तेवढा खर्च येणार आहे. तीस चाळीस हजार पर्यंत खर्च येईल. तर तेवढा खर्च महानगरपालिकेने उचलला तर त्याच्यात कोणते वावगे होणार आहे?

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण ह्याच्यावर मतदान घ्या. आमचा ह्याला विरोध आहे.

**मा. सभापती :-**

मतदान कशाला? ह्याच्यावर तुमचा विरोध नोंदविला आहे.

**अनंत पाटील :-**

नगरपालिकेच्या हद्दीत जो समुद्रकिनारा आहे त्याला सी.आर.झेड.चा त्याच्यात काही प्रश्न येत नाही ना, खर्च करण्यासाठी?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटीलजी आपल्या गावात जी स्मशानभुमी आहे ती सी.आर.झेड.ला आजही बाधित आहे. मी तुम्हांला सांगतो, पुर्वी नव्हते. पुर्वी तो प्रश्न आपल्याकडे प्रलंबित होता. त्याच्या आपल्याकडे गाइडलाईन आल्या नव्हत्या पण त्या गाइडलाईन आज आपल्याकडे आल्या. जर उद्या तुमच्या येथे जी स्मशानभुमी आहे ती सरकारी जागा आहे आणि तुम्ही त्या विनंती केली की, त्या ठिकाणी शेडस्चे काम झाले पाहिजे. मग आपण कोणता निर्णय घ्यायचा ते आपण सांगा. जर आपली राईगावातील स्मशानभूमी आहे ती स्मशानभूमी आज सी.आर.झेड.ला बाधित झालेली आहे आणि त्या ठिकाणी जर आपल्याला काम करायचे असेल. तर आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेला विनंती केली किंवा विनंती करणार नाही. विनंती करायची का नाही करायची, त्याच्यावर काम करायचे नाही करायचे? ते कसे होईल हे आपण आम्हांला जरा सुचवावे.

**अनंत पाटील :-**

ही जी राईची स्मशानभुमी आहे, ती स्मशानभुमी पुर्वीची आहे.

**मा. सभापती :-**

शेड ही पुर्वीची आहे.

**अनंत पाटील :-**

गॅमन इंडियाची जी जागा आहे ती आपल्या ताब्यात आहे का?

**मिलन पाटील :-**

त्याला टेम्पररी लिझ दिलेले आहे ते कायमस्वरुपी लिझ नाही.

**अनंत पाटील :-**

पण ते आपल्या ताब्यात दिलेले आहे का?

**मा. सभापती :-**

त्या ठिकाणी जागेचे आपले आरक्षण आहे. चौपाटीचे आरक्षण आहे आणि चौपाटीचे आरक्षण पडल्यानंतर आपल्याला सन्मा. जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्याला जागा ताब्यात दिली होती. परंतु काही कारणास्तव त्यांनी पुन्हा ती जागा आपल्या ताब्यातून काढून ती जागा गॅमन इंडियाला दिली. जेव्हा जागा त्यांनी आपल्या ताब्यात दिली होती त्यावेळी आपण तो शेड बांधला होता आणि त्यांनी जागा ताब्यात दिली व दुसऱ्या ब्रीजचे काम सुरु झाले. तेव्हा त्यांनी ती जागा गॅमन इंडियाच्या ताब्यात दिलेली आहे. म्हणजे आता गॅमनचे काम पुर्ण होते ते ॲग्रीमेंट पुर्ण होईल तेव्हा पुन्हा ती जागा आपल्याकडे रिटर्न येईल.

**अनंत पाटील :-**

आताच प्रशासनाने खुलासा केला की, ती जागा आपल्या ताब्यात नाही.

**मा. सभापती :-**

मी तुम्हांला तेच सांगतो. त्या ठिकाणी त्याचे आरक्षण आहे.

**मिलन पाटील :-**

शेड पुर्वीचा आहे की नाही? म्हणजे ती ताब्यात होती तेव्हा शेड बांधलेला आहे.

**मा. सभापती :-**

आपण तिथे शेड पुर्वीच बांधलेला आहे आणि तुमचा विरोध या विषयाला नोंदवलेला आहे. विषय बहुमताने मंजुर झालेला आहे आणि ते चर्चेला नको म्हणून आपण असा एक विषय मांडला की, अशा पद्धतीने जर आपण सरकारी जागेत काम करायचे नाही, अशा पद्धतीचे आपण बोललात तर तोही विषय बहुमताने होईल. परंतु, बहुमत आणि सर्वानुमत हे मत आपल्याशी निगडीत असलेल्या भावनांचा विचार करुन आपण केला पाहिजे. कारण भावना अशी की, उद्या तुमच्या गावातील स्मशानभुमीचा खर्च करावा लागला तर ती सी.आर.झेड.ला आहे व तिथे आरक्षण असेल तर तिथे काम केले पाहिजे की, नाही केले पाहिजे हे तुम्ही सांगा असे मला बोलायचे आहे.

**अनंत पाटील :-**

ते ठिक आहे. सरकारी जागेवर खर्च करु नये हा विषय आल्यानंतर मी बोलतो.

**मा. सभापती :-**

मग साहेब, ती जागा सरकारी आहे. राईचे स्मशान ही जागा सरकारी आहे. मालकीची जागा नाही.

**अनंत पाटील :-**

सरकारी जरी असतील. तुम्ही सी.आर.झेड.चा उल्लेख त्याला जोडत असाल तर सुभाषचंद्र बोस मैदानाचा ज्यावेळी उल्लेख झाला त्यावेळी मला तो विषय घ्यावा लागला.

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जे विद्यार्थी आहेत, स्पोर्टस्मेन आहेत तेच उपभोग घेतात. म्हणजे राई गावामध्ये राई गावातलेच उपभोग त्या स्मशानाचा करतात. तिथे जी प्रेते जातात ती राई गावातूनच जातात. म्हणजे प्रत्येक ठिकाणी जो आपला मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बाहेरचा त्या ठिकाणी जर कुठली गोष्ट आली तर त्याच्यावर बंधन आले तर आपल्याला ते चालेल. म्हणून तुम्ही जे मघाशी बोललात त्याचा खुलासा करण्याचे कारण हे होते की, सरकारी जागा बोलून चालणार नाही. आपली जी जागा असेल तर आपल्या आपल्या जागेवर आपण ती जागा ज्या कारणासाठी वापरतो तो उद्देश आपण पुर्ण केला पाहिजे. त्या उद्देशाला आपण अडून चालणार नाही. त्याप्रमाणे त्या ठिकाणी सुद्धा त्या परपझने काम करायला पडले तर आपण काम केले पाहिजे. तो अंतिष्ठेचा विषय आहे आणि हाही अंतिष्ठेचा विषय आहे.

**मिलन पाटील :-**

ह्याच्यावर सभापती साहेबांचा खुलासा बरोबर आहे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलतोय. सगळ्याच जागा स्मशानाच्या सरकारी जागेतच आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, त्याच्यासाठी आपण अधिकारी नेमला आहे. जे कायदेशीर आहे ते पुर्ण करा आणि नंतर त्याच्यावर खर्च करा.

**प्रकरण क्र. ११३ :-**

भाईंदर (पूर्व) जेसलपार्क चौपाटीवरील दशक्रिया विधी शेड नुतनीकरण करणे काम खाजगी संस्थेस देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय होणे.

**ठराव क्र. १२५ :-**

वरील विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पुर्व) जेसलपार्क चौपाटीवर महानगरपालिकेने विधीवत दशक्रिया कार्याकरिता शेड बांधलेली आहे. सदर शेडची जागा रेल्वेच्या पूलाकरिता गॅमन इंडियाने घेतल्याने सदर शेडचा वापर करता आला नाही व सध्या सदरची शेड नादुरूस्त अवस्थेत आहे. सदर शेडचे नुतनीकरण स्वखर्चाने करण्यास मे. प्रविण समाजसेवा मंडळ या संस्थेने मागणी केलेली आहे. सदर संस्थेस करारनामा करून सदर शेडचे नूतनीकरण व आवश्यक कामे करण्याकरिता परवानगी दिल्यास महानगरपालिकेचा खर्च वाचणार आहे व नागरीकांकरिता चांगली सुविधा उपलब्ध होणार आहे. असा प्रस्ताव प्रशासनाने दिलेला आहे.

वरील प्रमाणे प्रशासनामार्फत आलेला प्रस्ताव पाहत सदर दशक्रिया विधी शेडची दुरूस्ती महानगरपालिकेमार्फतच करण्यावी यावी. सदर शेड कोणत्याही संस्थेस देण्यात येऊ नये असा ठराव पारीत करण्यात येत आहे.

**ठरावाच्या बाजुने असलेले सदस्य :-**

१) श्री. मोहन मधुकर पाटील
२) श्रीम. रिटा सुभाष शहा
३) श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस
४) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर
५) श्री. अशोक बळवंत पाटील
६) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
७) श्री. मिलन गो. पाटील
८) श्री. केशव रामभाऊ घरत
९) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य:-**

१) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
२) श्री. पाटील अनंत रामचंद्र
३) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
४) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील. अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह.**
**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११४ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**
सभापती साहेबांच्या परवानगीने मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे......

**अशोक पाटील :-**
आपण ठराव मांडत आहात का?

**जोजफ घोन्सालवीस :-**
आम्हांला ह्याच्यावर बोलायचे आहे.

**रिटा शाह :-**
चर्चा हाऊ द्या नंतर ठराव मांडा.

**हॅरल बोर्जीस :-**
मी चर्चेत बाधा आणत नाही. मी ठराव मांडत आहे.

**रिटा शाह :-**
पण ठराव झाल्यानंतर चर्चा करण्यांत काय अर्थ आहे? तुम्ही ठराव मांडा पण अनुमोदन करायचे नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**
आम्हांला ह्याच्यावर बोलायचे आहे.
(सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**रिटा शाह :-**
आपण ठराव मांडलेला आहे. पण अनुमोदन करण्याच्या अगोदर त्याच्यावर चर्चा होऊ द्या.

**मा. सभापती :-**
अनुमोदन नंतर करा आधी त्याच्यावर चर्चा होऊ द्या.

**अशोक पाटील :-**
प्रस्ताव प्रशासनाने आणलेला आहे.

**रिटा शाह :-**

हा प्रस्ताव प्रशासनाने आणलेला आहे. त्याच्यावर चर्चा होऊ द्या. काशिमिरा रोडचे रेलिंग वगैरे ठिक आहे. मागे आपल्या स्थायी समितीची कमिटी तिथे गेली होती आणि अनधिकृत बांधकाम होते, दोन्ही बाजूला. श्री. शिवमुर्ती नाईक साहेब असतांना त्यांनी दिलेल्या रिपेअरिंगची परमिशन आणि त्यानंतर कुठलीही जागा न सोडता त्याच्यावर झालेले बांधकाम ते सर्व झालेले आहे. त्या विषयी सभेत एक-दोन आठवड्यात आणणारच आहात तर आपण हा विषय तेव्हा त्याच्याबरोबर एकत्र आणा. आपण ह्याच्यावर एकत्र निर्णय घेऊ.

**अशोक पाटील :-**

हा विषय त्याच्याशी कनेक्टेड आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे मिरा भाईंदर महानगरपालिकेत मागच्या वेळेला जाहिरात कर आपण दिला होता. त्या जाहिरात करामध्ये आपण अशी पॉलिसी ठरवली. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील व्यापारी प्रशासनाकडे, आपल्याकडे, मा. महापौरांकडे आले होते. त्यावेळेला त्यांनी असे सांगितले की, जाहिरात कर जो बोर्डाला लावला जातो तो कर आपल्याला देता येणार नाही. कारण तो कर आपण भरमसाठ लावतो अशा पद्धतीची चर्चा सर्व प्रकारचे जे व्यापारी आहेत त्यांनी ह्या ठिकाणी केलेली आहे. त्याच्यानंतर आपण मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील राहणारे सर्व व्यापारी वर्ग आहेत त्यांनाही तशा प्रकारची सुट दिली पाहिजे अशा पद्धतीचे मा. महापौर आणि प्रशासनाने त्यांना निवेदन दिले की, जे तुमचे मेन बोर्ड आहेत त्यांना आम्ही जाहिरात कर लावणार नाही. तो जाहिरात कर जेव्हा लावायचा नाही असे आपण सांगितले त्यावेळेला त्यानंतर आम्ही त्या संपुर्ण बजेटमध्ये तरतुद केली होती की, ह्या पोटी येणारा कर किती? आपल्याला किती रेव्हेन्यु मिळू शकतो? तर अंदाजे ६० लाख ८० हजार आपल्याला तुट येते. ज्यावेळेला ज्या व्यापाऱ्याने बोर्डावर जो जाहिरात कर लावलेला आहे तो लावायचा नाही. त्यामुळे आपल्याला ६० लाख ८० हजार भरुन काढले पाहिजे हाही आपला विषय आहेत. तर तो जाहिरात करामधूनच आपल्याला ते पैसे येणार आहे. ते पैसे तो रेव्हेन्यु आपल्याला मिळणार नाही तर तो विषय आपल्याकडे पुन्हा येणार आहे. त्यावेळेला ६० लाखाच्या तरतुदीप्रमाणे आपल्याला पैसे मिळाले पाहिजे. पर्यायाने आपल्याला रेव्हेन्यु मिळाला पाहिजे. तर रेव्हेन्यु मिळण्याच्या दृष्टीकोनातून आपल्याला प्रस्ताव आले होते आणि जर ते आपल्या सभेसमोर विषय आणल्यानंतर तो आपलाच व्यापारी वर्ग आहे आणि त्यांना आपण जी सुट दिलेली आहे आणि त्यांना सुट देऊ केली तर ती सुट आणि ती सुट आपल्याला भरता आली पाहिजे. या अनुषंगाने हा प्रस्ताव येण्या अगोदर तो प्रस्ताव आपल्याला येणार होता. परंतु, ती तुट कुठे दाखवायची हा आपल्यापुढे प्रश्न होता. परंतु काही व्यापाऱ्यांचा असा प्रश्न आला की, अशा पद्धतीने आपण जाहिरात केली तर तुम्हांला आम्ही एवढे पैसे देऊ किंवा तुमची जी फी असेल ती आम्ही तुम्हांला देऊ. तर आम्ही सांगितले की, फी आणि पैसे देणे हा विषय नाही. पण आपण जाहिर निवेदन देऊन त्या पद्धतीने आपण काम केलेत तर त्यांनी सांगितले आम्ही रस्त्याची देखभाल करु. अशा पद्धतीचा त्यांचा प्रस्ताव आला होता. जर आपण ६० लाख ८० हजाराची तुट येते आणि ही तुट जर आपल्याला भरता येत असेल त्या अनुषंगाने त्यांचा प्रस्ताव त्याच वेळेला आला होता. दुसऱ्या ठिकाणी इतर लोकांचा त्या अनुषंगाने हा विषय आपण आणलेला आहे. जर आपल्याला देत असेल या पद्धतीने तर आपल्याला ती तुटही भरता येईल आणि रस्त्याचे सुशोभिकणही होऊ शकते. म्हणून आपण हा विषय येथे आणलेला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, आपण फक्त व्यापारी लोकांना सुट देता. पण व्यापारी हा व्यापार करण्यासाठी बोर्ड लावतो. तर व्यापार करणाऱ्याला तुम्ही सुट का देता? बोर्ड लावण्यासाठी त्यांना जी तुम्ही सुट दिलेली आहे ती व्यापारीकरणातून ते दोन पैसे कमवणारच. मग त्यात महापालिकेचे उत्पन्न तुम्ही का बुडविता?

**मा. सभापती :-**

त्याचा निर्णय मा. महापौरांनी घेतलेला आहे की, जेव्हा मिरा भाईंदर परिसरातील, हद्दीतील व्यापारी आपल्याकडे येतात मग हद्दीतील व्यापाऱ्यांना जो बोर्ड लागतो आणि बाकी जाहिरात कराला नाही. त्या बोर्डावर त्यांनी जर इतर जाहिरात लावली. जसे उदा. सुर्यकांत ॲण्ड सन्स शॉप, ठिक आहे. पण सुर्यकांत ॲण्ड सन्स शॉप लावल्यानंतर त्या शॉपवर अमुकाची जाहिरात लावली तर त्याचे आपण पैसे आकारतो. त्यांना आपण ही एक सुट अशी दिली की, तुम्ही त्याच्यावर जाहिरात लावायची नाही. ज्याचे दुकान आहे त्या दुकानाप्रमाणे त्याने करायचे. अशा पद्धतीचे ते केल्यानंतर म्हणून सन्मा. महापौर, सन्मा. उपमहापौर आणि प्रशासन एकत्र बसून त्या ठिकाणी आलेल्या व्यापाऱ्यांचे डेलिगेशन

सर्व पक्षाच्या लोकांनी त्याला रेकमेन्डेशन केले होते की, अशा पद्धतीचे व्यापारी आहेत तर ह्या व्यापाऱ्यांना आपण नावापुरते सुट द्यायची. पण आपण ते सुट देण्यापुर्वी तत्कालीन आयुक्त, उपायुक्त, मुख्याधिकारी जे आपले नाईक साहेब होते. त्यांच्या वेळेला आपण त्या जाहिरातीचा कर लावला होता, तो त्या त्या बोर्डावर लावलेला कर त्या कराची रक्कम ६० लाख ८० हजार आपल्याला मिळत होती. पण आपले सन्मा. पदाधिकारी, मा. महापौर, मा. उपमहापौर व मा. आयुक्त साहेब ह्यांनी निर्णय घेतला आणि अनेक पक्षांच्या लोकांनी त्याला दुजोरा दिला की, अशा पद्धतीने ह्या लोकांना तुम्ही सुट द्यावी. ही सुट दिल्यानंतर तेवढी तुट आपल्याला निघून येते.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, माझ्या बोलण्याचा उद्देश असा आहे की, रस्त्यावर जे जाहिरातीचे बोर्ड लावतात त्याबद्दल मी बोलतो. दुकानाच्या समोर आहे त्याचा उल्लेख मी करत नाही. जे दुकानाचे आहे त्यांना तुम्ही माफ करा. पण जे रोडला जाहिरात लावतात त्यांना तुम्ही कर माफ करु नका.

**मा. सभापती :-**

ज्या जाहिराती रस्त्यावर लागतात व ज्या जाहिराती आपल्या मुख्य रस्त्यावर, मुख्य चौकात ज्या जाहिराती आहेत आणि त्याच्या पलिकडे दुकानांवर ज्या जाहिराती आहेत त्या जाहिरातीचा कर आपण केला नाही. फक्त त्याचे दुकान आहे व त्या दुकानासमोर शटरच्या वर आपण जो बोर्ड लावतो त्यालाही आपण मागच्या बजेटमध्ये त्याचे संभाव्य कर त्यात समाविष्ट केले होते.

**सुर्यकांत भोईर :-**

मग ते ठिक आहे.

**मिलन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जो रोड बनवलेला आहे तो इतका सुंदर आणि चांगला आहे. उड्डाणपुल आहे. बाहेरचे लोक आले की, त्याची प्रशंसा करतात आणि त्याही पलीकडे जाऊन मी सांगतो की, आपण एक छोटासा त्याच्यावर जर टोल बसवला आता जे स्थानिक लोक आहेत त्यांना सोडून, तिथे आपल्याला उत्पन्न मिळेल व त्याच्यात खर्चही निघून जाईल. स्थानिक लोकांना आपण सुट देऊ.

**अशोक पाटील :-**

आपल्याला त्या रस्त्याने दहा वेळा ये-जा करायची असते आणि सभापती महोदय, माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, हा जो प्रस्ताव हॅरल बोर्जीस साहेबांनी मांडला. ठिक आहे. तुम्हांला जी तुट ६० लाख ८० हजाराची त्यात मा. महापौर साहेबांनी त्यांच्या अखत्यारित व्यापाऱ्यांना दिलेली आहे. त्यात हरकत नाही. त्यात तुम्ही डिसीजन घेतले आणि ते ह्या माध्यमातून भरुन निघेल अशी शाश्वती वाटते. तर ते करायला सभागृहाची हरकत नाही. परंतु, या ठरावाचे इम्प्लिमेंटेशन आपण जो काशिमिरा रस्त्याचा विषय घेणार आहात त्याचा निर्णय झाल्यानंतर हे करावे अशी मी सुचना मांडत आहे.

**रिटा शाह :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे आणि ह्या रेलिंगवर जाहिरात कोणाचे होणार?

**सुर्यकांत भोईर :-**

जाहिरातीने साधारण किती उत्पन्न मिळेल?

**मा. सभापती :-**

सदरचा विषय पुढच्या सभेत घेण्यांत येईल.

**प्रकरण क्र. ११४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (काशिमिरा रोड) रस्त्याच्या दुतर्फा तयार केलेल्या रेलिंगवर जाहीरात करण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १२६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग रस्त्याचे रुदीकरण व दोन्ही बाजूस नाले बांधून फुटपाथ तयार करणे, रेलिंग लावणेचे काम पुर्ण झालेले आहे. सदर रेलिंगवर रेलिंग बसविण्यात आलेली असून रेलिंगची लांबी ५.०० कि.मी. एवढी आहे. सदर रेलिंगवर प्रत्येकी उभ्या खांबावर ठराविक एवढया साईजचे जाहिरात बोर्ड बसवून जाहिरातीकरिता दिल्यास महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल. परंतु काही एजन्सीनी सदर रत्यावर जाहिरतीकरिता परवानगी दिल्यास, सदर रेलिंगची देखभाल, दुरुस्ती, रंगरंगोटी करुन संपूर्ण रस्ता साफसफाईची जबाबदारी घेण्याची तयारी दर्शविलेली आहे.

वरीलप्रमाणे प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेला प्रस्ताव पाहता सदर रस्त्याची साफसफाई व रेलिंगची देखभाल व दुरूस्ती महागनरपालिकेमार्फत करण्यात यावी. तसेच सदर रेलिंगवर जाहिरात करणे कामी इच्छूक अनुभवी संस्थांकडून जाहिर निविदा प्रसिद्धी करून प्रस्ताव मागविण्यात यावीत. सदर प्रस्तावानुसार स्वखर्चाने फलक तयार करुन महानगरपालिकेस जी संस्था जास्तीत जास्त रक्कम जाहिरात कर देईल त्याला काम देण्यात येईल असा प्रस्ताव मागविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११५ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

ऑलरेडी तलावाचे लिलाव झाले आहेत. पैसे स्विकारले आहेत. त्यांच्या ताब्यात तलाव दिले आणि लोकांनी मासळी सोडली. फक्त दोन तलावाचे त्या लोकांनी बाकी ठेवले आहे, मोर्वा आणि नवघर. नागरिकांचे, त्या गाववाल्यांचे असे म्हणणे आहे की, ते तलाव आता अर्धी झालेली आहेत. वीस-वीस वर्ष त्याचा उपसा केलेला नाही.

**मिलन पाटील :-**

नाले तलाव कुठे आले?

**विजय पाटील :-**

उत्तनला.

**मिलन पाटील :-**

उत्तन म्हणजे नेमके कुठे?

**गजानन भोईर :-**

ते नेमके अधिका-यांनी सांगावे.

**मिलन पाटील :-**

आपल्याला माहिती आहे का, नाले तलाव कुठे आले आहे?

**विजय पाटील :-**

नाही.

**प्रभात पाटील :-**

मग विषय आला कसा?

**मिलन पाटील :-**

आपण विषय कसा काय घेतला? हा जो नाले तलाव आहे, आपल्याला काही आवश्यकता नाही. एकवीस हजाराने महानगरपालिकेला काही एक फरक पडणार नाही. त्या तलावात आजूबाजुची इतकी गुरे जातात आणि ते तलाव जर घेतले, त्या तलावाचा जो टेंडरधारक असतो तो त्या तलावामध्ये गुरांना जाऊ देत नाही आणि आजूबाजुचे जे छोटे शेतकरी आहेत ते भाजीपाला त्या तलावावर लावतात, त्यांना भाजीपाला लावू देत नाही. ह्याला माझा विरोध आहे. आपण तो तलाव त्याच्यातून काढून टाका. हा तलाव आपल्याला लिलावाला द्यायचा नाही.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, त्या तलावाचे लिलाव झालेले आहे आणि त्याचे पैसेही स्विकारले आहेत.

**मिलन पाटील :-**

नाले तलावाचे नाही. आम्ही नाले तलावाला मान्यता देणार नाही.

**गजानन भोईर :-**

विजय पाटील आपण ह्या विषयाची माहिती द्यावी.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईरजी बोलतात त्या विषयची आपण माहिती द्यावी.

**गजानन भोईर :-**

आपण आम्हांला माहिती द्यावी की, किती तलावाचे लिलाव झाले आहेत आणि किती तलाव बाकी आहेत?

**विजय पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या अनुमतीने बोलतोय. भोयाल तलाव, नाले तलाव, गावदेवी तलाव मुर्धे, राममंदिर तलाव राई, मोर्वा तलाव, मोर्वा नविन तलाव, नवघर जुना तलाव, काशी जरीमरी तलाव, गोडदेव तलाव आणि नवघर नविन तलाव ह्यांचे प्रशासनाकडून पेपरमध्ये जाहिरात देऊन तलावाचे लिलाव मागवले होते. त्याच्यामध्ये भोयाल तलाव, नाले तलाव, गोडदेव गावदेवी तलाव मुर्धे.......

**अशोक पाटील :-**

फक्त भोयाल तलाव आणि नाले तलाव कुठे आहे ते सांगा.

**विजय पाटील :-**

हे दोन्ही तलाव उत्तनला आहेत.

**अशोक पाटील :-**

त्याचा उल्लेख कुठे केला? उत्तन आहे की डोंगरी आहे?

**मिलन पाटील :-**

नाले तलाव उत्तनला कुठे आहे? ते कोणी घेतलेले आहे?

**प्रभात पाटील :-**

आपण सगळी माहिती सांगा. आपण असे परभारे विषय आणू नका.

**गजानन भोईर :-**

सर्व तलावाचे लिलाव ऑलरेडी झालेले आहेत.

**प्रभात पाटील :-**

मग हा विषय कसा आला?

**अशोक पाटील :-**

भोईर साहेब, लिलाव झालेला आहे. पण मंजुरी झालेली नाही.

**गजानन भोईर :-**

ते अधिकाऱ्यांनी येथे सांगावे.

**विजय पाटील :-**

हे मंजुरीसाठी आलेले आहे आणि ह्याला स्थायी समितीची मंजुरी लागते.

**मिलन पाटील :-**

ते कोणी घेतले आहे?

**प्रभात पाटील :-**

आपण असा विषय कसा आणला?

**गजानन भोईर :-**

सर्व तलावाचे लिलाव आधीच झाले आहेत.

**विजय पाटील :-**

भोयाल तलाव ह्याचा ठेका संदिप सावंतने घेतला आहे. त्याचा लिलाव झाला आहे आणि ते आपल्या मंजुरीसाठी आम्ही आपल्यासमोर ठेवले आहे.

**रिटा शाह :-**

विजय पाटील आपण पहिल्यांदा हे स्पष्ट करा की, लिलाव झाला आहे का बाकी आहे?

**विजय पाटील :-**

लिलाव झाला आहे आणि आम्ही ते मंजुरीसाठी ठेवले आहे.

**रिटा शाह :-**

लिलाव झाला तर आता कशाला आणले?

**विजय पाटील :-**

ह्याला स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता असते.

**रिटा शाह :-**

लिलाव जर असाच होऊन जातो मग आमच्या मंजुरीची काय गरज आहे? ह्याला माझा विरोध आहे. मी मंजुरी देणार नाही.

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, एक शंका विचारायची आहे की, हे लिलाव मंजुरीला द्यायचे आहे. त्याची सुचना तरी स्थायी समितीच्या समोर यायला पाहिजे की, त्यांची तीन वर्षे झालेली आहेत व सदरच्या निविदा पुन्हा काढायच्या आहेत असा एक विषय फॉरमॅलिटी म्हणून यायला पाहिजे का नाही? आणि ह्यांनी ऑलरेडी पेपर नोटीस दिली.

**विजय पाटील :-**

ह्याच्याकरिता मा. आयुक्त साहेबांची, मंजुरीसाठी परवानगी घेतलेली आहे.

**रिटा शाह :-**

आम्ही असे बोलत नाही की, आपण बिन परवानगीने आमच्याकडे हा विषय आणलेला आहे. आयुक्त साहेबांची, सभापती साहेबांची जर परवानगी असेल तरच विषय विषयपटलावर येतो. पण तुम्ही सर्व काम केल्यानंतर आमची मंजुरी कशाकरिता मागता.

**मिलन पाटील :-**

नाले तलाव कोणी घेतले आहे?

**विजय पाटील :-**

संदिप सावंतने दोन्ही तलाव घेतलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

ते नाले तलाव देवू नका. तिथे गुरांचे अतोनात नुकसान होईल. ते लहान तलाव आहे. त्याची मला माहिती आहे व तिथे गुरांना अजिबात दुसरीकडे पाणी प्यायला जागा नाही व तिथे ते लहान लहान शेतकरी भाजीपाला लावतात. ह्या ठेकेदाराने गेल्या वेळेलाही तिथे कोणाला भाजीपाला लावू दिला नाही. ते तिथे डब्याने पाणी नेतात आणि भाजी लावतात.

**प्रभात पाटील :-**

संदिप सावंत कोण?

**सुर्यकांत भोईर :-**

संदिप सावंत कोण?

**विजय पाटील :-**

भाईंदरमधला ठेकेदार आहे.

**प्रभात पाटील :-**

ठेकेदार आहे की, महापालिकेचा एक अधिकारी ह्या नावाचा आहे म्हणून मी विचारते.

**मिलन पाटील :-**

ते नाले तलाव देवू नका. तिथे खरोखर गरीब गुरांचे हाल होतील व त्याच्या आजुबाजूला गरीब शेतकरी आहेत ते डब्याने पाणी घेऊन भाजीपाला लावतात. त्या नाले तलावाला आमचा विरोध आहे.

**गजानन भोईर :-**

विजय पाटील आपण संपुर्ण माहिती द्या की, कुठले तलावाचे लिलाव झालेले आहेत आणि कुठल्या तलावाचे लिलाव बाकी आहे आणि आम्हांला तेच माहिती नाही, लिलाव झाले का नाही झाले? तुम्ही मंजुरीसाठी आणल. पण दोन तलावाचे लिलाव बाकी आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

१ ते ७ झालेले आहे.

**मिलन पाटील :-**

एक तलाव गुरांकरिता ठेवून द्या. नगरपालिकेचे काय एवढे गेलेले आहे. जर ते तलाव तुम्ही दिले तर त्याच्यात गुरांना पाणी प्यायला उतरु देत नाही. त्याची मासळी मरेल किंवा काय होईल म्हणून तो गुरांना उतरु देत नाही. हे एकच तलाव तिथे बाकी की, तिथे गुरे हे पाणी पितील. तुम्हांला जर गुरे मारायची असतील तर तुम्ही ह्या तलावाला मान्यता द्यावी. पण माझा ह्याला विरोध आहे. नाले तलावाला माझा विरोध आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी प्रकरण क्र. ११५ या विषयावर सन्मा. सदस्या रिटा शाह, प्रभात पाटील, सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी सदर विषयावर चर्चा केलेली आहे. चर्चेमध्ये आपल्याला सांगण्यात आले की, जेव्हा आपण लिलाव पुकारतो त्यावेळेला माझ्या माहितीप्रमाणे सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्यांना आपण बोलावतो व आपण ह्यांना बोलावले नाही.

**गजानन भोईर :-**

साहेब, आम्हांला बोलावले.

**प्रभात पाटील :-**

आम्हांला बोलावले नाही.

**विजय पाटील :-**

स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना पत्र दिलेले आहे.

**मिलन पाटील :-**

कुठे पत्र दिले? पत्र दिले तर आमच्या सह्या दाखवा.

**अशोक पाटील :-**

विजय पाटील साहेब, लिलाव पुकारण्याच्या वेळी तुम्ही बोलावता की, आज लिलाव आहे आणि आदल्या दिवशी तुम्ही पत्र देता. परंतु, लिलाव करण्यासाठी निविदा काढण्यासाठी तुम्ही स्थायी समितीसमोर विषय आणलेला नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

**विजय पाटील :-**

आम्ही लिलाव होण्याच्या चार दिवस अगोदर तुम्हांला पत्र दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

दि. १५/०७/२००४ रोजी हा लिलाव झाला. त्यावेळी सन्मा. सदस्य तिथे कोण होते?

**हॅरल बोर्जीस :-**

ह्यापैकी काही सदस्य नसतील.

**विजय पाटील :-**

ह्याच्यापैकी काही सदस्य नसतील कारण त्याच्यानंतर नविन सदस्य आलेले आहेत. पण त्याच्यात गजानन भोईर, अनंत पाटील हे आहेत.

**गजानन भोईर :-**

आम्हांला पत्र मिळाले होते.

**विजय पाटील :-**

अशोक पाटील साहेबांना पत्र दिलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

त्यांना बोलावले मग आम्हांला का नाही पत्र दिले?

**विजय पाटील :-**

स्थायी समितीचे जेवढे सदस्य आहेत त्यांना सर्वांना आम्ही पत्र दिले होते.

**प्रभात पाटील :-**

आम्हांला कुठे पत्र दिले?

**विजय पाटील :-**

दिनांक अमुक अमुक रोजी अशा ठिकाणी.....

**गजानन भोईर :-**

पत्र दिले होते.

**प्रभात पाटील :-**

मग त्यांना कसे पत्र दिले होते? ते जुने नाही. मग त्यांना कसे पत्र दिले?

**विजय पाटील :-**

ते हजर होते.

**गजानन भोईर :-**

माझ्याकडे लिलावाचे पत्रदेखील आहे.

**प्रभात पाटील :-**

त्यांना कसे पत्र दिले? मग तिथे आमचा का हक्क नाही?

**विजय पाटील :-**

मॅडम तुम्हांलाही पत्र दिलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण विचारा. आमच्याकडे पत्र नाही.

**विजय पाटील :-**

१५/०७/२००४ ला स्थायी समितीचे जेवढे सदस्य होते त्या सर्वांना पत्र दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

आपण पत्र दिल्याची नोंद आपल्याकडे असेल. त्याची माहिती आपण आणा.

**मिलन पाटील :-**

साहेब, आपण नाले तलाव येथे गुरांचा विचार करुन तो फक्त तुम्ही लिलाव करुन देवू नका. बाकी दुसरे करा ते आम्हांला मान्य आहे.

**मा. सभापती :-**

जे सन्मा. सदस्य होते त्या सर्वांच्या सह्या घेतलेल्या आहेत.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, सदस्यांच्या सह्या घेतल्या पण माझा प्रश्न असा होता की, मला बोलावले नाही आणि मला पत्रही नाही.

**विजय पाटील :-**

दि. १५/०७/२००४ ला जे सदस्य होते, स्थायी समितीवर त्यांना बोलावले.

**प्रभात पाटील :-**

बरोबर आहे. मग गजानन भोईर कसे होते?

**गजानन भोईर :-**

मला पत्र मिळाले.

**विजय पाटील :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स, मोहन म. पाटील, याकुब इस्माईल कुरेशी, धनराज अग्रवाल, आसिफ गुलाब शेख, गावंड हरेश लक्ष्मण, चंद्रकांत सिताराम वैती, नितीन गोपीनाथ ठाकुर, दिनेश नलावडे, अशोक बळवंत पाटील, पाटील शरद केशव, हॅरल जॉर्ज बोर्जीस, मिलन म्हात्रे, पाटील अनंत रामचंद्र, जोजफ जॉन घोन्सालवीस व रिटा सुभाष शाह ह्या सगळ्यांच्या सह्या आहेत.

**प्रभात पाटील :-**

पण गजानन भोईर ह्यांना पत्र कसे गेले?

**गजानन भोईर :-**

लिलावाचे पत्र आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही एका तलावाचे काढून टाका. बाकीच्याला आम्हांला ऑब्जेक्शन नाही.

**मा. सभापती :-**

ह्याच्यात एकाला तुमचे ऑब्जेक्शन नाही आणि त्याच्यात दोन विषय आणखीन असे आहे की, आपल्याला एका तलावाचे २२,०००/- रुपये त्याचे यायला पाहिजे आणि दुसऱ्या तलावाचे ७१,०००/- रुपये यायला पाहिजे. तर ७१,०००/- पोटी त्याने आपल्याला ३१,०००/- रुपये सांगितले आणि २२,०००/- रुपयांपोटी ११,०००/- रुपये त्याने बोलले आहे. तर ही किंमत अर्ध्याच्याही जवळपास किंमत आहे. तर आपल्याला सत्तर टक्के तरी यायला पाहिजे. नव्वद टक्के, ऐंशी टक्के नाही तर सत्तर टक्के तरी यायला पाहिजेत. पंच्याहत्तर टक्के नाही, साठ टक्के नाही. तर असा लिलाव आपण मंजुर करायचे का?

**मिलन पाटील :-**

नाही. हेही बरोबर आहे.

**मा. सभापती :-**

हा फायनान्शियल लॉस करुन चालणार नाही. पण प्रशासनाचे म्हणणे आहे की, तुम्ही आणखीन एकदा ह्याचा लिलाव काढा.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, दोन तलावाचेच लिलाव बाकी आहेत.

**मा. सभापती :-**

मी देखील दोन तलावांविषयीच बोलतोय.

**गजानन भोईर :-**

दोन्ही विषयी सभापती साहेब मी स्पष्टीकरण करतो. नवघर जुने तलाव हे जवळ जवळ पहिल्यापेक्षा वन थर्ड झालेले आहे आणि तेहतीस टक्के बाकी आहे आणि गेले २० वर्ष त्याच्यातून कधीही गाळ उपसलेला नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण गाळ उपसायला लावू.

**अशोक पाटील :-**

वन थर्ड झालेले आहे. म्हणजे त्याच्यावर काय अतिक्रमण झाले आहे का?

**गजानन भोईर :-**

नाही. सुशोभिकरण केलेले आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी या लिलावाच्या विषयात जो सहभाग घेतला, प्रकरण क्र. ११५ वर. आज आपली तलाव आहेत आणि तलावाचा लिलाव केल्यानंतर आपल्याला ॲडीशनल रेव्हेन्यु मिळतो. फक्त या ठिकाणी एकाच तलावाचा असा विषय आहे की, ७१,५००/- रुपये ह्याचे आपल्याला पन्नास टक्के सुद्धा पुर्ण रक्कम आपल्याकडे येत नाही आणि ह्याच्याविषयी आपण दोनदा लिलाव पुकारला होता आणि तीन वेळा लिलाव पुकारुन आलेली ही किंमत ह्याच्यापेक्षा पुन्हा कमी किंमत येता कामा नये. जे दोन तलाव लिलावाबद्दल आहेत ५ आणि ६, मोर्वा नविन तलाव आणि नवघर जुने तलाव.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, ५५ हजार रुपये जी किंमत आलेली होती त्याचा संपुर्ण तलाव होता आणि आता त्याचा वन थर्ड तलाव बाकी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण ह्याच्यात तीन वर्षे आहे.

**गजानन भोईर :-**

तीन वर्ष जरी असली तरी काय झाले? ५५ हजार हे तीन वर्षाचेच होते आणि वीस वर्षे त्याचा गाळ काढलेला नाही. त्याची किंमत कमी यावी. अजून जुन्या तलावाचा गाळ काढलेला नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, गाळ काढला आहे.

**गजानन भोईर :-**

अजून गाळ काढलेला नाही. पंधरा वर्षात गाळ काढलेला असेल तर तुम्ही मला दाखवा.

**दिपक खांबित :-**

सुशोभिकरण केलेले आहे.

**गजानन भोईर :-**

सुशोभिकरण केले आहे. पण पंधरा वर्षात गाळ काढलेला नाही. तलाव खोदलेले नाही. फक्त बांधकाम केलेले आहे.

**मा. सभापती :-**

काय करायचे? लिलाव करायचे नाही का?

**गजानन भोईर :-**

विरोध नाही. कमी करा. तुम्ही लोकांना द्या.

**मा. सभापती :-**

ते दिलेलेच आहे आणि त्याचा लिलाव हा कमी आलेला आहे.

**गजानन भोईर :-**

कमी कुठे आलेला आहे?

**प्रभात पाटील :-**

नवघर तलाव आणि मोर्वा तलाव देण्यांत यावा.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, एका वर्षात ते तलाव खोदायचे असे आम्हांला सांगितले. ज्यावेळी नाईक साहेबांकडे चार्ज होता त्यावेळी एका वर्षात तलाव खोदुन देऊ असे त्यांनी आम्हांला सांगितले. एका वर्षात मासळी वाढणार नाही. ते त्यांचे एक वर्ष फुकट जाणार नाही म्हणून ह्यांची किंमत कमी करावी.

**मा. सभापती :-**

किंमत कमी झालेली आहे ना?

**गजानन भोईर :-**

किंमत कमी झालेली नाही.

**मा. सभापती :-**

लिलाव झालेली किंमत कमी आलेली आहे.

**गजानन भोईर :-**

आता कमी आणलेली आहे. अकरा हजाराने द्यावी.

**मा. सभापती :-**

५५ हजार रुपयाने लिलाव झालेला आहे.

**गजानन भोईर :-**

तो तीन वर्षाकरिता होता. त्यावेळेला संपूर्ण तलाव होता आणि आता बांधकाम करुन तलाव अर्धा झालेला आहे.

**प्रभात पाटील :-**

ते ३१ हजार एकत्र केले आहे ना?

**गजानन भोईर :-**

नाही. अजुन ते कुठे केले आहे? नाईक साहेबांनी त्याच्यावर दिले होते की, सदर तलाव ३१ हजार रुपयांनी द्यावा.

**मा. सभापती :-**

आपला साफसफाई हा विषय वेगळा आहे आणि आपल्याकडे जे लिलाव आलेले आहेत त्या विषयी तुम्ही बोला. लिलावधारक आपण आहात का? जर लिलावधारक आपण असाल तर ही गोष्ट आम्ही मान्य करु. लिलावधारक हे वेगळे आहेत. मला असे सांगायचे आहे की, आपण जो लिलाव दिलेला आहे त्याची आपण तीनदा नोटीस काढली आणि तीनदा नोटीसमध्ये आपल्याला अकरा हजार आणि एकतीस हजार रुपये अशा दोन तलावाची प्रत्येकी आपल्याकडे आलेली आहे. आपल्याला किती यायला पाहिजे? तर बावीस हजार रुपये आणि एकाहत्तर हजार रुपये यायला पाहिजे. आता ही तीनदा आपल्याकडे एवढीच रक्कम आलेली आहे. ती रक्कम मंजुर करायची आहे की नाही करायची?

**गजानन भोईर :-**

मंजुर करायची.

**मा. सभापती :-**

मग तुम्ही असे बोला. तर आपण तलाव खोदायचे, नाही खोदायचे असे चालले आहे.

**गजानन भोईर :-**

असे ते झाले तर चांगले आहे. जी आम्ही दिलेली किंमत आहे त्याच्यापेक्षा कमी झाली तर आणखीन चांगले.

**अशोक पाटील :-**

नाले तलावाचे काय?

**मा. सभापती :-**

आपण ते तलाव दिलेले आहे.

**मिलन पाटील :-**

दिलेले आहे. तर त्याला मार्च महिन्यापर्यंत एक वर्षाकरिता द्या. तीन वर्षाकरिता द्यायचे नाही.

**विजय पाटील :-**

साहेब, आपण त्यांच्याकडून पैसे स्विकारलेले आहेत.

**मिलन पाटील :-**

एक वर्षाकरिता द्या. दहा हजाराने महापालिकेला काही नुकसान होणार नाही. आपल्याला गुरे मारायची आहेत का? नाहीतर गुरांकरिता आपण नविन तलाव खोदा. पाणी प्यायला गुरे कुठे जाणार? तुम्ही सर्व काय विक-विक चालवले आहे. तुम्ही त्याला ह्या ३१ मार्चपर्यंत द्या. एक वर्षाकरिता द्या. अन्यथा तुम्ही तिथे गुरांकरिता पाणपोई बांधा. गुरांची पाणी प्यायची समस्या सोडवा.

**मा. सभापती :-**

त्या ठिकाणी जागा उपलब्ध असतील तर गुरांकरीता पाणपोई बांधायची किंवा त्या ठिकाणचा जो लिलाव दिलेला आहे त्याचे संपुर्ण पैसे एकतीस हजार रुपये आपण स्विकारलेले आहेत. तर त्या विषयी आपण आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करु आणि त्या चर्चेमध्ये जर सोयीचा मार्ग निघाला नाही तर पाणपोई किंवा एका वर्षाकरिता असेल तर आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करुन आपण त्याच्यावर निर्णय घेऊ.

**मिलन पाटील :-**

एक वर्षाकरिता त्याला पाहिजे असेल तर द्या. म्हणजे ३१ मार्च ते संपेल.

**रिटा शाह :-**

साहेब, एक कन्फ्युझन आहे. मिलन पाटील साहेब बोलतात की, एका वर्षासाठी द्या. कारण गुरे पाणी कुठे पिणार? पण आता एक वर्षाकरिता मंजुरी देऊ पण त्या एका वर्षाकरिता गुरे पाणी प्यायला कुठे जाणार? हा माझा प्रश्न आहे.

**मिलन पाटील :-**

ते तिथे पाणपोई बांधतील. ते गुरांकरिता पाणी प्यायला तिथे खड्डा करुन देतील.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, गुरांना पाणी प्यायला सोय करावी.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने, प्रकरण क्र. ११५, तलाव लिलाव सन २००४-२००७ बाबत प्रशासनाकडून जो गोषवाराल आपल्याला दिलेला आहे. त्या गोषवाऱ्यामध्ये अनुक्रमांक ५ आणि ६ मोर्वा नविन तलाव आणि नवघर जुने तलाव ह्याची प्रशासनातर्फे आपल्याला गोषवाऱ्यामध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे. त्याचप्रमाणे सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी जी सुचना मा. सभापती साहेबांना केलेली आहे. त्या सुचनेविषयी आपण मा. आयुक्त साहेबांशी या विषयी चर्चा करुन फक्त एक वर्षाकरिता हा तलाव लिलावामध्ये, अनुक्रमांक २ बद्दल मिलन पाटील साहेबांनी जे येथे विचार मांडलेले आहेत की, तलावाचा आपण लिलाव देताना गुराढोरांचा प्रश्न जो आहे तो सुद्धा आपण मार्गी लावला पाहिजे. तर त्या विषयी आपण मा. आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करा व एक वर्षाकरिता तो ठेका फक्त त्या तलावापुरती दिला तर गुराढोरांचा प्रश्न निघेल.

**मिलन पाटील :-**

आणि ह्याच्यापुढे देवू नये.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, त्यांची सुचना फक्त गुराढोरांकरिता आहे. तर ठेकेदाराला तशी समज द्यावी की, जनावरांसाठी तलावाचे पाणी खुले करण्यांत यावे आणि ते एका तलावाकरिता नाही तर राई-मुर्धा, मोर्वाचे जे तलाव आहेत त्याच्यात देखील गुरंढोरे पाणी प्यायला जात असतील. तर त्यांना ते तलाव खुले करुन देण्यांत यावे.

**गजानन भोईर :-**

त्यांना पहिले सुचना द्याव्यात की, गुरे उतरवायला किंवा पाणी प्यायला त्याला तुम्हांला परवानगी द्यायची असेल तर द्या नाहीतर सोडून द्यावे.

**मा. सभापती :-**

आपण तलावात गुरे उतरवत नाही तर तलावाच्या बाजुला आपण गुरांना पाणी प्यायला व्यवस्था केली पाहिजे. कारण तलावाचे पाणी आपल्याला कधीही कामाला येऊ शकते. तलावात गुरांना उतरवायचा विषय नको तर ह्या बरोबर गुरांचा विचार करावा.

**अशोक पाटील :-**

आणि तुम्ही म्हणता त्या पद्धतीने पाणपोईची सोय करण्यांत यावी, प्रत्येक तलावाच्या बाजुने.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ११५ विवरणपत्रकातील तलाव क्र. १, २, ३, ४, ७, ८ आणि ९ ह्या तलावाच्या लिलावास मंजुरी मिळावी म्हणून या सभागृहामध्ये मी ठराव मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ११५ :-**

तलाव लिलाव, सन २००४ ते २००७ बाबत.

**ठराव क्र. १२७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील महानगरपालिकेच्या मालकीच्या तलावांत मस्यबीज सोडणे, माशाचे उत्पादन करणे या कामाचे सन २००४-२००५ या वर्षाचे जाहीर लिलावाबाबत वृत्तपत्रांत जाहीरत देऊन लिलाव बोलवण्यांत आलेले होते. लिलाव करण्यांत आलेल्या तलावाच्या पुर्वीच्या किंमतीमध्ये ३०% वाढ सुचवून सन २००४-२००७ पर्यंत लिलाव घेण्यांत आलेले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | तलावांची नांवे | पुर्वीची किंमत | ३०% वाढ सुचवून केलेली किंमत | लिलावाद्वारे मिळालेली किंमत | मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोयाल तलाव | १४,०००/- | १८,२००/- | २२,०००/- | ०१/०४/२००४ ते ३१/०४/२००७ |
| २ | नाले तलाव | २१,०००/- | २७,३००/- | ३१,०००/- | ,, |
| ३ | गावदेवी तलाव - मुर्धे | १६,०००/- | २०,८००/- | ५५,०००/- | ,, |
| ४ | राममंदिर तलाव - राई | १२,०००/- | १५,६००/- | २३,०००/- | ,, |

| अ.क्र. | तलावांची नांवे | पुर्वीची किंमत | ३०% वाढ सुचवून केलेली किंमत | लिलावाद्वारे मिळालेली किंमत | मुदत |
|---|---|---|---|---|---|
| ५ | मोर्वा नवीन तलाव | १२,०००/- | १५,६००/- | ११,०००/- | '' |
| ६ | नवघर जुना तलाव | ५५,०००/- | ७१,५००/- | ३१,०००/- | '' |
| ७ | काशी जरी मरी तलाव | ३०,०००/- | ३९,०००/- | ४०,२००/- | '' |
| ८ | गोडदेव तलाव | २४,०००/- | ३१,२००/- | ४०,००/- | '' |
| ९ | नवघर नवीन तलाव | २९,०००/- | ३७,७००/- | १,००,०००/- | '' |

वरील तलावांच्या बाबत दि. ०७/०७/२००४ व दि. ०१/०८/२००४ रोजी वृत्तपत्रांत जाहीर नोटीस देऊन दि. १४/०७/२००४ व दि. ०९/०८/२००४ रोजी तलावांचे लिलाव घेण्यांत आले. यामध्ये वरील विवरणांत नमुद केलेले ७ तलावांचे लिलाव तीन वर्षाकरिता देणार आहेत. या नऊ तलावांपैकी मोर्वा नवीन तलाव व नवघर जुना तलाव यांचे अनुक्रमे रु. १५,६००/- व रु. ७१,०००/- अशी किंमत महानगरपालिकेने ठरवलेली होती. सदर किंमत ही ठेकेदारांना जास्त वाटत असल्याने ही किंमत ठेकेदारांना मान्य नसल्याने लिलावांत भाग घेऊनही वरील महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या किंमतीस बोली बोलण्यांस ठेकेदार तयार झाले नाहीत. या नंतर महानगरपालिकेने परत एकदा वृत्तपत्रांत दि. १९/०८/२००४ रोजी जाहीरात देऊन दि. २१/०८/२००४ रोजी लिलाव बोलवण्यांत आले होते परंतु या लिलावांत भाग घेणाऱ्या ठेकेदारांनी मोर्वा नवीन तलावाकरिता रु. १०,०००/- व नवघर जुना तलाव या करिता रु. २०,०००/- पर्यंत किंमतीत तीन वर्षाकरिता ठेका मिळावा अशी विनंती केलेली होती. वरील दोन तलावांचे लिलाव तीन वेळा बोलावून ही महानगरपालिकेने ठेवलेली किंमत मान्य करण्यांस व या ठेवलेल्या किंमतीत ठेका घेण्यास कोणीही ठेकेदार पुढे आलेला नाही, तरी ठेकेदारांची विनंती व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून ठेकेदारांनी मागणी केलेल्या रक्कमेत थोडी वाढ करण्यांत आली. रु. ११,०००/- मोर्वा नवीन तलाव व नवघर नवीन तलाव रु. ३१,०००/- देणे बाबत प्रशासनाने घेतलेला निर्णय योग्य असून नवघर नवीन तलाव रु. ३१,०००/- व मोर्वा नवीन तलाव रु. ११,०००/- या रक्कमेला तीन वर्षा करिता देण्यांस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच प्रशासनाने सन २००४-२००५ या वर्षात तलावाचे घेतलेले लिलाव अनुक्रमे १, २, ३, ४, ७, ८, ९ ला (विवरण पत्रामध्ये नमुद केलेल्या किंमतीप्रमाणे) ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.       अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.१५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**